## ‘यापुढे प्रयोगशील शेतकरी होणार मानद कृषी संशोधक’



**परभणी :** राज्यात अनेक शेतकरी नवनव्या वाणांच्या निर्मितीपासून ते पीक पद्धती, अवजारे, लागवड यासंदर्भात कल्पकतेने काम करताना दिसतात. त्यांचे कामही शास्त्रज्ञांएवढेच मोलाचे आहे. राज्यातल्या सगळ्याच विद्यापीठांनी कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना निवडून ‘मानद कृषी संशोधक’ म्हणून सन्मानित करावे. प्रत्येक विद्यापीठाने दरवर्षी पाच शेतकऱ्यांचा या पद्धतीने गौरव करावा व त्यांचे कार्य सर्व शेतकऱ्यांसमोर आणावे, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले. राज्यातल्या चारही कृषी विद्यापीठांच्या ५३ व्या संयुक्त कृषी संशोधन विकास समितीच्या बैठकीचे उद्‌घाटन गुरुवारी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. कृषी विद्यापीठांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पिकांसाठी एआयद्वारे नवे मॉडेल विकसित करावे, अशी अपेक्षाही या वेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३१२
www.ramprahar.com

शुक्रवार, ३० मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


दिव्यांगांचे सर्वेक्षण व प्रमाणपत्र वितरण करा -मंत्री अतुल सावे/२

पनवेल महानगरपालिकेत समन्वय कक्ष स्थापन/६

पालघरला होणार इक्विपड पॉवरलिफ्टिंग स्पर्धा/८


# ऑपरेशन सिंदूर अजूनही संपलेले नाही -पीएम मोदी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि.२९) पश्चिम बंगालमधील अलीपुरद्वार येथे कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी केली. या वेळी जाहीर सभेला संबोधित केले. या वेळी त्यांनी पाकिस्तानला थेट इशारा दिला. पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा घुसून हल्ला केला आहे. ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.



पंतप्रधान मोदी पुढे म्हणतात, २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूर कृत्यानंतर देशभरात खूप संताप होता. आमच्या माता-बहिणींचे सिंदूर पुसण्याचे धाडस केले, पण आपल्या सैन्याने त्यांना सिंदूरची ताकद दाखवून दिली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने जगाला सांगितले की, जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला, तर शत्रूला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.

पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा त्यांच्या घरात घुसून हल्ला केला आहे. आम्ही शक्तीची पूजा करतो. आम्ही दहशतवादाचे अड्डे नष्ट केले, ज्याची पाकिस्तानने कल्पनाही केली नव्हती. पाकिस्तानकडे दहशतवादाशिवाय काहीही नाही. पाकिस्तानने फक्त दहशतवादाला पोसले आहे. जेव्हा थेट युद्ध होते, तेव्हा पाकिस्तानचा पराभव निश्चित असतो. हेच कारण आहे की पाकिस्तानी सैन्य दहशतवाद्यांची मदत घेते, अशी टीका पंतप्रधानांनी केली.

आज जेव्हा भारत ’विकसित राष्ट्र’कडे वाटचाल करत आहे, तेव्हा बंगालचा सहभाग अपेक्षित आणि आवश्यक आहे. या उद्देशाने, केंद्र सरकार येथे पायाभूत सुविधा, नवोपक्रम आणि गुंतवणुकीला सतत नवीन चालना देत आहे. बंगालचा विकास हा भारताच्या भविष्याचा पाया आहे. आज त्या पायावर आणखी एक मजबूत वीट जोडण्याचा दिवस आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

# ‘चारित्र्यसंपन्न समाज निर्मितीसाठी अहिल्यादेवी होळकर प्रेरणादायी’



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चारित्र्यसंपन्न समाज निर्मितीसाठी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना समजून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश प्रभारी अध्यक्ष वर्षाताई भोसले यांनी खांदा कॉलनी येथे आयोजित महिला मेळाव्यात केले.

अखंड परिश्रम, जनसेवेचा वसा आणि न्यायप्रियतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या वतीने हा विशेष महिला मेळावा आणि भव्य रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. खांदा कॉलनीमधील श्री कृपा हॉल येथे गुरुवारी (दि.२९) हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या मेळाव्याला प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहरे, चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला मोर्चा सरचिटणीस वृषाली वाघमारे, उपाध्यक्ष प्रिया मुकादम, संध्या शारबिद्रे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रमिला पाटील, राजश्री वावेकर, प्रिती जॉर्ज, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमीत झुंझारराव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची यंदा ३०० वी जयंती साजरी केली जात आहे. या निमित्ताने भाजपच्या वतीने २१ ते ३१ मे या कालावधीत (पान २ वर..)

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उद्यापासून पनवेलमध्ये भव्य कीर्तन महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अध्यात्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य आणि दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा २ जून रोजी ७४ वा वाढदिवस असून ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहेत. त्या अनुषंगाने ३१ मे ते २ जूनपर्यंत खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीच्यावतीने तीन दिवस भव्य स्वरूपात कीर्तन महोत्सव होणार आहे.



लोकनेते रामशेठ ठाकूर दानशूर व्यक्तिमत्व म्हणून महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण देशात ओळखले जातात. त्यांचे सर्व क्षेत्रातील योगदान नेहमीच आदर्शवत राहिले आहे. त्यांनी सामाजिक बांधिलकी कायम जपली आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन व अर्थसहाय्य केले आहे, त्याचबरीबरीने अध्यात्मिक क्षेत्रातही त्यांचे कार्य मोलाचे आहे, मंदिरे बांधणे, मंदिराचे जिर्णोद्धार तसेच दिंडीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सढळ हस्ते मदत केली आहे, त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा अध्यात्मिक सोहळा मोठ्या प्रमाणात उत्सव म्हणून साजरा झाला पाहिजे, यासाठी वारकरी संप्रदायातील व्यक्तींनी पुढाकार घेतला आहे.

दानशूरता, समाजसेवा आणि अष्टपैलू कर्तृत्व यांच्या अद्वितीय संगमामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासारखं व्यक्तिमत्व संपूर्ण जिल्ह्यात दुर्मिळच आहे. त्यामुळे त्यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस वर्ष संपूर्ण वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमाने साजरा करण्याचा निर्णय लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीने घेतला आहे. अमृत महोत्सवी वर्षाच्या पदार्पण निमित्त अध्यात्मिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, कला अशा क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यात येणार असून कीर्तन महोत्सव हा पहिला अध्यात्मिक कार्यक्रम असणार आहे. यामध्ये संगीत भजन, हरिपाठ, हरी कीर्तन आणि अध्यात्मिक क्षेत्रातील ज्येष्ठांचा सन्मान करण्यात येणार आहे. या वेळी तीन दिवस कीर्तन साथकरी म्हणून पनवेल, उरण, खालापूर परिसरातील समस्त वारकरी संप्रदायातील गुणीजन मंडळांची साथ लाभणार आहे.

शनिवार दिनांक ३१ मे रोजी दुपारी २ वाजता या महोत्सवाची सुरुवात प्रतिमा पूजनाने आणि दुपारी ३ वाजता रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांच्या भजनाने होणार आहे. सायंकाळी ४ वाजता ५० हरिपाठ (पान २ वर..)


## देशामध्ये महाराष्ट्राची परकीय गुंतवणुकीत आघाडी -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राने पुन्हा एकदा परकीय गुंतवणुकीत देश पातळीवर आघाडी घेतली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी तब्बल ४० टक्के आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

गत आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील १० वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतच पार झाला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या ऐतिहासिक आणि विक्रमी गुंतवणुकीवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रातील जनतेचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वाखाली राज्याची प्रगती अशीच सुरू राहील, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला आहे.




## निवडक

### कुख्यात नक्षलवादी कुंजम हिडमा याला पकडण्यात यश

**नवी दिल्ली :** नक्षलवादविरोधी मोहिमेत सरकारला मोठे यश मिळाले आहे. सुरक्षा दलांनी कुख्यात नक्षलवादी कुंजम हिडमा याला ओडिशाच्या कोरापुट जिल्ह्यातील बैपारीगुडा पोलिसांनी पेटगुडा जंगलातून गुरुवारी (दि.२९) अटक केली. त्याच्याकडून एके-४७ बंदुकांसह मोठ्या प्रमाणात स्फोटकेही जप्त करण्यात आली आहेत. कोरापूट पोलिस आणि डीव्हीएफच्या संयुक्त कारवाईत त्यांना यश मिळाले आहे.


### अमेरिकी व्यापार शुल्क स्थगितीने जागतिक पातळीवर चैतन्य

**मुंबई :** अमेरिकी न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अतिरिक्त व्यापार शुल्काला स्थगिती दिल्याने जागतिक भांडवली बाजारांमध्ये तेजीचे प्रतिबिंब उमटले. परिणामी सलग दोन सत्रातील घसरणीनंतर प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये वाढ झाली. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्समध्ये ३२०.७० अंशांची वाढ झाली आणि तो ८१,६३३.०२ पातळीवर स्थिरावला.

# रायगड जिल्ह्यात पावसामुळे टंचाईग्रस्त गावांना दिलासा

**अलिबाग : प्रतिनिधी**

दरवर्षी जून महिन्यात सुरू होणाऱ्या पावसाने या वर्षी २० मेपासूनच संततधार कोसळण्यास सुरुवात केली आहे. या पावसामुळे टंचाईग्रस्त गावांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाणीटंचाईमुळे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ४१ वाड्या आणि २३८ वाड्यांना ४० टँकरने पाणीपुरवठा सुरू होता, मात्र आठवडाभर कोसळणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील पाणीटंचाई संपुष्टात आली असून, टँकरने करण्यात येणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.



या वर्षी लोकांना उन्हाळ्याची दाहकता मोठ्या प्रमाणात जाणवली. मे महिन्यात विहिरी, नाले, तलाव, बोअरवेल कोरड्या पडल्या होत्या. पाणीपुरवठा गावोगावी योजना राबवण्यात आल्या असल्या तरी पाणीटंचाईची समस्या संपलेली नाही. ग्रामस्थांची पाण्यासाठी वणवण सुरू होती. टंचाईग्रस्त भागात टँकरच्या माध्यमातून ११२ वाड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला. पाणीपुरवठ्यासाठी प्रशासनाने १५ जूनपर्यंत टँकर अधिग्रहित केले होते, मात्र आठवडाभरापासून जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत आहे. पावसामुळे विहिरी, तलाव, नाल्यातील पाणीपातळी वाढू लागली आहे. त्यामुळे टंचाईग्रस्त गावांची संख्या कमी झाली आहे.

पावसामुळे सर्वत्र पाणी पाणी झाले आहे. पारंपरिक जलस्त्रोतांमध्येही पाणीसाठा झाला आहे. (पान २ वर..)

**सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुढील अनेक दिवसांचा पाणीसाठा निर्माण झाला आहे. त्यामुळे टँकरने पाणीपुरवठा करणे थांबवले आहे. जिल्ह्यातील अधिकाऱ्यांशी बोलूनच हा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या गावांत पिण्याच्या पाण्याची समस्या असेल त्या गावांत पुन्हा टँकर पुरवठा करण्यात येईल.**
**-संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद**

**प्रमुख धरणातील पाणीसाठा (टक्के)**

| धरण | पाणीसाठा | धरण | पाणीसाठा |
|---|---|---|---|
| फणसाड | १० | कुडकी | १७ |
| वावे | २० | पाभरे | ४७ |
| सुतारवाडी | ५३ | वरंध | १९ |
| कवेळे | १ | खिंडवाडी | १९ |
| कार्ले | १५ | खैरे | २८ |

# महापुरुषांचे गुण अंगीकारल्यास जीवनाचे सार्थक होईल -आमदार पडळकर

## कळंबोलीत अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त युवा प्रेरणा संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापुरुषांचा एक जरी गुण आपण अंगीकरण केल्यास आपले जीवन सार्थकी लागेल, असे प्रतिपादन जत मतदार संघाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी कळंबोलीमध्ये आयोजित केलेया युवा प्रेरणा संवाद कार्यक्रमात केले तसेच ३१ तारखेला राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंत्ती विविध कार्यक्रमांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरी करा, असे सांगितले.




भारतीय जनता पक्षाकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त २१ ते ३१ मे या कालावधीत सामाजिक पर्व म्हणून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून अहिल्यादेवींच्या समाज सुधारणेतील योगदान, प्रशासनातील पारदर्शकता, महिला सक्षमीकरणासाठीचा दृष्टिकोन आणि सांस्कृतिक वारसा यांचा नव्या पिढीला परिचय करून देण्याचा भाजपचा प्रयत्न असून त्या अनुषंगाने उत्तर रायगड जिल्हा भाजपच्यावतीने जिल्हा आणि तालुका मंडल स्तरावर विविध कर्यक्रमांचे आयोजन करून सामाजिक पर्व मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. त्याअंतर्गत उत्तर रायगड भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त युवा प्रेरणा संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम कळंबोली सेक्टर १ई येथील नवीन सुधागड शाळेत आयोजित करण्यात आला होता. युवा पिढीला अहिल्यादेवींच्या कार्याची माहिती मिळावी आणि त्यातून प्रेरणा घ्यावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, आपल्या पुढच्या पिढ्यांनी तसेच तरुणांनी महापुरुषांच्या कर्तृत्वातून आणि (पान २ वर..)

# विशेष मोहिमेद्वारे दिव्यांगांचे सर्वेक्षण व प्रमाणपत्र वितरण करा -मंत्री अतुल सावे



**मुंबई, : प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्तींना अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे शासकीय योजना, विविध सवलती, शिक्षण, नोकरी तसेच आरोग्यविषयक सुविधा मिळवण्यात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेता दिव्यांग बांधवांचे सर्वेक्षण व प्रमाणपत्र वितरणासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी, असे निर्देश दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

पदभार स्वीकारल्यानंतर मंत्री अतुल सावे यांनी या विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी दिव्यांग कल्याण विभागाचे आयुक्त प्रवीण पुरी, दिव्यांग कल्याण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश थविल, उपसचिव सुनंदा घड्याळे तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सावे म्हणाले, दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनवण्यासाठी विभागामार्फत स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार असून दिव्यांगांच्या रोजगारासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येणार आहे. दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसाहाय्य वाढवण्याबाबतही शासन सकारात्मक असून आरोग्य विभागाच्या सहकार्याने दिव्यांग प्रमाणपत्र वाटपासाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत दिव्यांग शाळांमध्ये सुधारणा, रिक्त पदांची तत्काळ भरती, योजनांची प्रभावी अंमलबजावणी, महानगरपालिकेच्या मार्फत दिव्यांगासाठीच्या राबविण्यात येणाऱ्या योजना याबाबत चर्चा करण्यात आली.

## अलिबाग येथील मांत्रिकासह चार जणांना अटक; ४० लाख रुपयांची फसवणूक

**अलिबाग : प्रतिनिधी**

तुमची काही समस्या असल्यास ती सोडवून देतो असे सांगून तिघांची ४० लाखांना फसवणूक केल्या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात मांत्रिक, त्याची पत्नी , दोन मानसपुत्र चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारही आरोपींना अटक करण्यात आली आसून त्यांना शुक्रवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहे. अलिबागचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी ही माहिती दिली.

महेश यशवंत मोरे त्यांची पत्नी अपुर्वा मोरे, दोन मानसपुत्र मिहीर मांजरेकर उर्फ मिहीर मोरे आणि सागर कुंड अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पनवेल येथे राहणाऱ्या बांधकाम व्यवसायिकाने केलेल्या कामांचे पैसे अडकून पडले होते. हे पैसे लवकर मिळवेत म्हणून अलिबाग येथे राहणारे महेश मोरे यांच्याकडे गेले. त्यांनी जादूटोणा करण्याचा सल्लादिला व व्यावसायिकाची ३८ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केली.

दुसऱ्या एकाच्या कौटुंबिक वाद मिटावे यासाठी दोन लाख २५ हजार रुपये घेऊन त्यांची फसवणूक केली. एका व्यक्तीची १ लाख २९ हजारांना फसवणूक केली या कुटूंबांचा विश्वास संपादन करून एक जेसीबी आणि एक थार गाडीही या मांत्रिकांने मागून आहे.

## महावितरणचा २० वा वर्धापन दिन

**कल्याण : प्रतिनिधी**

महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ६ जून २०२५ रोजी महावितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिन साजरा होत आहे. या निमित्ताने आयोजित विद्युत सुरक्षा सप्ताहादरम्यान मॅरेथॉन, रॅली, निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ग्राहकांना सुरक्षाविषयक ई-मेल व एसएमएस पाठविणे, भित्तीपत्रके, चित्रफिती अशा विविध माध्यमांव्दारे विद्युत सुरक्षेविषयी लोकांच्यात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

## पान १ वरुन

### 'चारित्र्यसंपन्न समाज निर्मितीसाठी अहिल्यादेवी होळकर प्रेरणादायी'



'सामाजिक पर्व' म्हणून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच अंतर्गत खांदा कॉलनी येथे आयोजित महिला मेळावा आणि रांगोळी स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, गेल्या दहा दिवसांपासून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवींचे कर्तृत्व समाजासमोर वेगवेगळ्या माध्यमातून येत आहे आणि महाराणींचे चारित्र्य समजून घेण्याचा योग आपल्याला आला आहे. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची आणि कार्याची माहिती घेतल्यानंतर ती समाजासमोर नेण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमादरम्यान रांगोळी स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. यात हर्षदा फगरे यांनी प्रथम, तनिषा भोईर यांनी द्वितीय तर अंजली खौंड यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सर्व विजेत्यांना तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उद्यापासून पनवेलमध्ये भव्य कीर्तन महोत्सव

मंडळांचे सामुदायिक हरिपाठ, त्यानंतर सायंकाळी ५. ३० वाजता आदरणीय गुरुतुल्य सत्कारमूर्ती कीर्तनकार महाराजांचा सत्कार सोहळा, सायंकाळी ७ वाजता ह.भ. प. उमेश महाराज दशरथे (परभणी) यांचे हरिकीर्तन त्यानंतर रात्री ९ वाजता महाप्रसाद होणार आहे. रविवार १ जून रोजी दुपारी २. ३० वाजता शिवशंभो प्रासादिक मंडळ (चिंचिवली गोहे) यांचे भजन, सायंकाळी ४ वाजता ४५ हरिपाठ मंडळांचे सामुदायिक हरिपाठ, सायंकाळी ५. ३० वाजता आदरणीय गुरुतुल्य सत्कारमूर्ती कीर्तनकार महाराजांचा सत्कार सोहळा, सायंकाळी ७ वाजता संत माणकोजी महाराज बोधले यांचे ११ वे वंशज ह. भ. प. ॲड. जयवंत महाराज बोधले (पंढरपूर) यांचे हरिकीर्तन, रात्री ०९ वाजता महाप्रसाद तर सोमवार दिनांक ०२ जून रोजी दुपारी २. ३० वाजता नाद ब्रह्म साधना भजन मंडळाचे भजन, सायंकाळी ४ वाजता ४६ हरिपाठ मंडळांचे सामुदायिक हरिपाठ, सायंकाळी ५. ३० वाजता आदरणीय गुरुतुल्य सत्कारमूर्ती कीर्तनकार महाराजांचा सत्कार सोहळा, सायंकाळी ७ वाजता ह. भ. प. विश्वनाथ महाराज वारिंगे (अंबरनाथ) यांचे हरिकीर्तन आणि वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अभिष्टचिंतन सोहळा आणि रात्री ९ वाजता महाप्रसाद होणार आहे, अशी माहिती लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीच्यावतीने देण्यात आली आहे.

### रायगड जिल्ह्यात पावसामुळे टंचाईग्रस्त गावांना दिलासा

या अनुषंगाने ग्रामीण भागातील नागरीकांना दिलासा मिळाला असला तरी हे पाणी गढूळ असल्याने प्यायचे कसे असा प्रश्न नागरीकांना पडला आहे. हे पाणी गाळून उकळून प्यावे लागत आहे. तर काहींनी इतर कामासाठी हे पाणी वापरून पिण्यासाठी जारचे पाणी विकत घेणे कायम ठेवले आहे.

चौकट

धरणांतील पाणीसाठ्यात वाढ

पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा वाढला आहे. २१ मे पर्यंत २८ धरणांमधील पाणीसाठा २७ टक्के इतका होता. यातील सात धरणांमध्ये केवळ १० टक्के पाणी शिल्लक होते. आठवडाभर झालेल्या पावसाने धरणातील जलसाठ्यात ११ टक्क्यांनी वाढ झाली आहे. रोह्यातील सुतारवाडी धरण पूर्ण भरले आहे. मे महिना संपेपर्यंत पाणी टंचाईचे ढग अधिक गडद होण्याची भती व्यक्त केली जात होती, परंतु पावसाने लवकर हजेरी लावल्याने जलचिंता बरयाचअंशी मिटली आहे. २२ मे पासून आतापर्यंत जिल्ह्यात पाऊस कोसळतो आहे. आधी अवकाळी, नंतर मान्सूनपूर्व आणि त्यानंतर मान्सूचा पाऊस मे महिन्यातच बरसला. जिल्ह्यात आतापर्यंत ५०४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

### महापुरुषांचे गुण अंगीकारल्यास जीवनाचे सार्थक होईल -आमदार पडळकर

त्यांच्या जीवन चरित्रातून आदर्श घेऊन मार्गक्रमण करावे असे सांगतले तर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनीही, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचवण्यासाठी या मेळाचे आयोजन केला असल्याचे सांगून महापुरुषांच्या स्वाभिमानाचा इतीहास आपण आपल्या पुढच्या पिढीला सांगीतला पाहिजे असे आवाहन केले.

या मेळाव्याला जत मतदार संघाचे आमदार गोपीचंद पडळकर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजप नेते प्रल्हाद केणी, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंजाराव, खालापूर पूर्व मंडळ अध्यक्ष सनी यादव, नावडे मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी मंडळ अध्यक्ष रवीनाथ पाटील, भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, बबन बारगजे, अशोक मोटे, माजी नगरसेवक बबन मुकादम, रवी भगत, माजी नगरसेविका मोनिका महानवर, प्रमिला पाटील, युवामोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अमर ठाकूर, महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्ष प्रिया मुकादम, विद्या तामखडे, मनीषा निकम, सरस्वती कथारा, कळंबोली युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने तरुण उपस्थित होते.

---

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३ ई-मेल :- panvelcorporation@gmail.com

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना जाहिर सूचना देण्यात येते की. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांर्तगत सर्व मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २०२५ २०२६ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व मालमत्ता धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५५ अन्वये ऑनलाईन पध्दतीने व प्रत्यक्ष मालमत्ता कराची देयके बजावणेत येत आहेत.

तथापि, महानगरपालिका क्षेत्रातील सन २०२५ २०२६ आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके तयार (जनरेट) करणेत आलेली आहेत. ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची देयके प्राप्त झालेली नाहीत. त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा PMC TAX - APP वर नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, ज्या मालमत्ता धारकांना ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घेणे शक्य नाही अशा मालमत्ता धारकांनी मुख्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयामधून देयके उपलब्ध करुन घ्यावीत. सदर प्रमाणे कार्यवाही न झाल्यास ऑनलाईन प्रसिध्दी दिनांकापासून देयके बजावण्यात आलेली आहेत असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच, दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंत चालू वर्षाचा एकरक्कमी मालमत्ता कर भरणा केल्यास चालू मागणीवर ५% सुट देण्यात येते व मालमत्ता कराचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यास अतिरिक्त २% सुट देण्यात येते.

सर्व मालमत्ता धारकांनी आपली देयके ऑनलाईन किंवा ऑफलाईन व्दारे प्राप्त करुन घेऊन मालमत्ता कराचा भरणा लवकरात लवकर करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

सही/-
उपायुक्त (कर)
पनवेल महानगरपालिका

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/ प्र.क्र.२३०/२३३/२०२५**
**दिनांक :- २९/०५/२०२५**

---

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

ई-मेल :- panvelcorporation@gmail.com दूरध्वनी कार्यालयः-०२२-२७४५८०४०/४१/४२

सन २०२५-२०२६ करीता पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना बांबूपासून विविध उत्पादने बनविण्याकरीता कौशल्य विकास कार्यक्रम राबविणेकरीता खालील नमुद केलेल्या बाबीकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

### कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कालावधी | प्रती लाभार्थी खर्च रु. |
|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना बांबूपासून विविध उत्पादने बनविण्याकरीता कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे (बांबूचे कॉफी मग, फुट बास्केट, टी-ट्रे, लॅम्प डायरी इत्यादी सारख्या वस्तू) | १ महिना | |

१. सीलबंद दरपत्रके दि.५/६/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागात अथवा samup.pmc@gmail.com वर स्वीकारण्यात येतील.

सही/-
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/ प्र.क्र.२२७/२३०/२०२५**
**दिनांक :- २८/०५/२०२५**

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना क्र. २

ई निविदा सूचना क्र. ०९/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक १०/०५/२०२५ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक एक्टिव्ह टाईम्स, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई,दैनिक भास्कर, मुंबई,दैनिक खबरें आजतक, मुंबई,दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, ता.माणगाव व रोहा, जिल्हा रायगड येथे होणाऱ्या हायटेक फार्मास्युटिकल पार्कचा विकास, संचलन, देखभाल आणि व्यवस्थापनासाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (पीपीपी) या तत्वावर विकासकाची निवड करण्यासाठी प्रस्ताव ची विनंती. | ₹ ०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १३/०६/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १४/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती.... महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची दोन वर्षांच्या कालावधीकरीता सर्वसमावेशक वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३९,०६,७७०.०० |
| २. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... अग्निशमन केंद्र व अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती... एक वर्षाच्या कालावधीसाठी विविध परिसरांच्या देखभाल व नियमित देखभालीसाठी सेवा पुरविणे. | ₹ २२,७७,१८३.०० |
| ३. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... तळोजा सांडपाणी निःसारण योजनेच्या टप्पा -१ पंपिंग स्टेशनवरील ६० अश्वशक्ती मोटर स्टार्टर पॅनल बदलणे. | ₹ ४०,१५,८६०.०० |
| ४. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ महाड औद्योगिक क्षेत्रात ६३० केव्हीए कॉम्पॅक्ट सब-स्टेशनचा पुरवठा करणे, उभारणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ २५,०५,२४०.०० |
| ५. | रोहा औद्योगिक क्षेत्रासाठी पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ रोहा बायपास रोडवरील बूस्टर पंपाचे परिचालन व देखभाल दुरूस्तीकरीता सेवा पुरविणे. | ₹ २३,८८,१२०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०३/०६/२०२५ ते दिनांक १७/०६/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामांबाबत दिनांक ०५/०६/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा उपरोक्त दिनांक ०९/०६/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### टायर बदलताना एकाचा मृत्यू

**पनवेल :** तामिळनाडू येथून मुंबईच्या दिशेने जाणारा भरधाव टेम्पो, रस्त्यावर नादुरुस्त स्थितीत उभ्या असलेल्या टेम्पोवर धडकल्याने झालेल्या अपघातात नादुरुस्त टेम्पोच्या खाली टायर बदली करण्यासाठी गेलेला चालक टेम्पोच्या टायर खाली सापडल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना कळंबोली जवळ घडली. या अपघातात टेम्पोला धडक देणारा टेम्पो चालकदेखील जखमी झाला असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्याविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

### मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** तालुक्यातील खुटारी गावात राहणाऱ्या परमजित बॉट सिंग (वय ६९) हे आजारी असल्याने त्यांच्या शेजाऱ्यांनी त्यांना उपचारासाठी कामोठे एमजीएम रुग्णालयात नेले. तेथे सिंग यांचा मृत्यू झाला. त्यामुळे त्यांच्या नातेवाईकांचा शोध तळोजा पोलीस घेत आहे.

### महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

**पनवेल :** महापालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी (दि.२९)



महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एका दिवसातच देहरंग धरण ओव्हरफ्लो

## पनवेलकरांचे पाणी संकट टळले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलकरांचे पाणी संकट टळले आहे. सोमवारी (दि.२६) झालेल्या मुसळधार पावसामुळे एकाच दिवसात देहरंग धरण ओसंडून वाहू लागल्याने पनवेलकराना पाणी संकटापासून दिलासा मिळाला आहे. यामुळे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला इतर आस्थापनावर अवलंबून राहण्याची चिंता मिटली आहे.

सध्या पालिका देहरंग धरणातून पनवेलसाठी ५ एमएलडी पाणी घेत होते. पुढील १५ दिवस धरणातील पाणी पुरेल असे नियोजन पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले होते, मात्र यापुढे १६ एमएलडी पाणी देहरंग धरणातून घेतले जाणार आहे. पनवेलमध्ये सोमवारी तब्बल २४१ मिमी पावसाची विक्रमी नोंद करण्यात आली. मे महिन्यात प्रथमच पाऊस पडल्याने देहरंग धरण पहिल्यांदाच मे महिन्यात ओव्हरफ्लो झाला



आहे. विशेष म्हणजे धरणाचे पाणी सांडव्यातुन बाहेर जाऊ लागला आहे. पनवेल महानगरपालिकेने यावर्षी पाणीपुरवठ्याचे उत्तम नियोजन केले होते. पाणीपुरवठा अधिकारी विलास चव्हाण यांनी याबाबत सूक्ष्म पाण्याचे नियोजन करीत पाण्याचा तुटवडा निर्माण होऊ नये यादृष्टीने प्रयत्न केले होते. माथेरान डोंगराच्या पायथ्याशी पनवेल पालिकेच्या मालकीची २७७ हेक्टर जमीन असून त्यापैकी १२५ हेक्टरवर देहरंग धरण आहे. स्वत:च्या मालकीचे धरण असणारी राज्यातील ही पहिलीच नगर परिषद म्हणून पनवेलचे नावलौकिक होते.

या धरणातून पनवेल शहराला पाणीपुरवठा केला जातो. माथेरानच्या डोंगराची माती वाहून आल्याने धरणाची साठवणूक क्षमता कमी झाली आहे. आजही मोठ्या प्रमाणात गाळ धरणात साचल्याने धरणाची क्षमता कमी झाल्याने एकाच मोठ्या अतिवृष्टीत धरण ओसंडून वाहून जाते. या धरणातील गाळ काढल्यास उन्हाळ्यातदेखील पूर्ण क्षमतेने देहरंग धरणातून पाणी पनवेल शहराला मिळू शकेल. सध्याच्या घडीला ३.५७ दशलक्ष घनमीटर पाणी साठवणूक क्षमता देहरंग धरणाची आहे. देहरंग धरणाचा विस्ताराचा विचार पालिका आयुक्त मंगेश चितळे यांचा आहे. त्यादृष्टीने त्यांनी प्रस्ताव तयार करून शासनाला पाठवला आहे.

देहरंग धरणातून पनवेल शहराला उन्हाळा वगळता इतर वेळी प्रति दिन १६ एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. शहराला पाण्याची दुप्पट मागणी आहे.याकरिता एमआयडीसी आणि एमजेपी कडून प्रत्येक १६ एमएलडी पाणी पालिका विकत घेते. मे अखेर धरण कोरडे पडल्यानंतर पालिकेला पाण्याकरिता पूर्णत: या दोन विभागांवर अवलंबून राहावे लागते. त्यासाठी वाढीव कोटा घ्यावा लागतो आणि कोट्यवधी रुपये मोजावे लागतात.मात्र यंदा हि चिंता मे महिन्यातच मिटली आहे.

**सोमवारी जवळपास २०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडल्याने धरणाने सांडवा पातळी गाठली. देहरंग धरण पूर्णक्षमतेने भरले असल्याने पनवेल शहराचे पाणी संकट टळले आहे. धरणात १५ दिवस पुरेल एवढे पाणी होते.मात्र मे महिन्यात क्षमतेपेक्षा जास्त पाऊस झाल्याने धरणातून यापुढे नियमित १६ एमएलडी पाणी घेण्याचे नियोजन केले आहे.**

**–विलास चव्हाण, पाणीपुरवठा अधिकारी, पनवेल महापालिका**





**उलवे : सेक्टर १७ येथील हनुमान मंदिरामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त उलवे रहिवासी संघटनेकडून अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, अवधेश महतो, श्याम मणी त्रिपाठी, उदय पांडे, अवनीश सिंग, मनोज मौर्य, देबलॉय मित्रा, दिनेश सिंग अग्रहरी, सर्वेश राणा, आरसी पिल्लई, शेखर नडार, सागर रंधबे, भरत गुप्ता, कपिल यादव, संदीप मागर, अखिलेश विश्वकर्मा, प्रल्हाद सागर, मीना भवशार, अंजली मिश्रा, रचना बाथम, कृष्णा झा, जयश्री सिंग आदी उपस्थित होते.**

# कामोठ्यातील हॉटेल फोडून १६,५०० रुपयांची रोकड पळवली

## सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरटे कैद

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरातील न्यू वेलकम फॅमिली रेस्टॉरंट या हॉटेलमध्ये चोरीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. रात्रीच्या सुमारास दोन अनोळखी चोरट्यांनी हॉटेलचे शटर वाकवून आत प्रवेश केला आणि मुख्य काउंटरमधील गल्ला फोडून रोख १६,५०० रुपये चोरून नेले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

हर्षल देवानंद पाटील (वय २३), हे या हॉटेलचे मालक असून, त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्या किचन सुपरवायझरने फोन करून हॉटेलचे शटर वाकलेले आणि गल्ला उघडलेला असल्याची माहिती दिली. त्यानंतर मालक पाटील व मॅनेजर मिलिंद पाटील हॉटेलवर पोहचले असता, गल्ल्यातील १६,५०० रुपये रोख रक्कम चोरीस गेल्याचे निष्पन्न झाले. यात १०, २०, ५०, १००, २००, ५०० अशा विविध किमतीच्या नोटा व ४५० रुपये चिल्लर रक्कम असल्याचे सांगण्यात आले. हॉटेलमध्ये बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन चोरटे स्पष्टपणे दिसून येत आहेत. त्यापैकी एकाने डोक्यावर रूमाल व तोंडावर मास्क बांधला होता.

हे चोरटे स्क्रू ड्रायव्हरच्या सहाय्याने गल्ला फोडताना सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. कामोठे पोलीस स्टेशनने घटनेची नोंद घेतली असून, चोरट्यांचा शोध सुरू आहे. परिसरातील इतर सीसीटीव्ही फुटेजचीही तपासणी सुरु असून लवकरच आरोपींचा माग काढला जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# सर्वसामान्यांसाठीच्या शासन योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी –गोविंदराज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा विविध योजनाच्या अंमलबजावणीमध्ये अग्रेसर जिल्हा आहे. विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय आणि सहकार्याने काम केल्यास सर्वसामान्याचे जीवन सुकर होण्यास मदत होणार आह. तरी शासनाच्या सर्व योजनाची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश नगर विकास विभागाचे प्रधान सचिव तथा रायगड जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. के. गोविंदराज यांनी दिले.

पनवेल येथील तहसीलदार कार्यालयात पालक सचिव डॉ.गोविंदराज यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्ह्यातील विविध विभागाच्या योजनाची आढावा बैठक आज घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे, उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अग्रीस्टॅक योजना, जलजीवन मिशन, जलसंधारण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, लाडकी बहीण योजना या प्रमुख योजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. अग्रीस्टॅक योजनेच्या जिल्ह्यातील कामगिरी बाबत असमाधान व्यक्त करून या कामाला विशेष गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.



कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरिता केंद्र शासनाची ग्रिस्टॅक योजना आह. यासाठी १०० टक्के नोंदणी करावी. महसूल आणि कृषी विभागाने परस्पर समन्वय साधून काम करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील जलसंधारण च्या कामांचा यावेळी आढावा घेण्यात आला. विविध जलाशयातील गाळ काढण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आह. परंतु अपेक्षित काम झालेले नसल्याचे आढळून येत आह. याबाबत संबंधित विभागाने एप्रिल अखेर पर्यंत जलाशयात पाणीसाठा असल्याने गाळ काढता आला नसल्याचे सांगितले

जलजीवन मिशनच्या कामाचा आढावा यावेळी घेण्यात आला. पाण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी पाणी बचत, योग्य प्रमाणात वापर, पुनर्प्रकिया करुन वापर याबाबत आराखडे तयार करावेत. नदी, नाले आदी पाणी साठे स्वच्छ कशा होतील यासाठीचे नियोजन करुन अंमलबजावणी करावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील विविध योजनांच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती, प्रशासनाचे नियोजन आणि कार्यवाही याबाबत माहिती दिली.

### ‘लक्ष केंद्रीत करून निधी खर्च करावा’

***कोणतीही योजना राबवितांना त्या माध्यमातून होणारा फायदा किंवा लाभावर लक्ष केंद्रीत करून निधी खर्च केल्यास त्या योजनेचा सामान्य जनतेला नक्कीच फायदा होण्यास मदत होते. त्यानुसार प्रत्येक योजनेचे नियोजन करुन ती राबविण्यात यावी, असेही डॉ. गोविंदराज यांनी सांगितले.***

# भाजपतर्फे तक्का येथे स्वच्छता कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत पनवेल शहर मंडळातर्फे तक्का येथील शिवमंदिरात घाट आणि मंदिर स्वच्छता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या उपक्रमात ज्येष्ठ नेते आणि उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, पनवेल शहर मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंझारराव यांच्या नेतृत्वाखाली



झालेल्या या कार्यक्रमात माजी नगरसेवक गणेश कडू, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, संदीप बहिरा साहेब, प्रभाग २०चे अध्यक्ष रघुनाथ बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, पनवेल शहर मंडळाचे सरचिटणीस रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, कोषाध्यक्ष प्रवीण मोरबाळे, जगदीश परदेशी, सचिन चिखलेकर, भारत बहिरा, मनीषा बहिरा, रुपेश परदेशी आणि भारतीय जनता पार्टीचे अनेक कार्यकर्ते तसेच तक्का गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श घेऊन, परिसराची स्वच्छता आणि मंदिरांचे पावित्र्य जतन करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सहभागी कार्यकर्त्यांनी मंदिराचा घाट आणि परिसराची स्वच्छता केली.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखेतील जान्हवी हातमोडे हिला भारत, थायलंड, नेपाळ, श्रीलंका आणि अमेरिकेत कार्य करणाऱ्या प्रसिध्द मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीतर्फे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल एमव्हीएलए भारतज्योती नॅशनल लेव्हल युथ अचिव्हर्स अवॉर्ड २०२५ जाहीर झाला आणि २५ मे २०२५ रोजी हैदराबाद शहरात हा पुरस्कार प्रदान सोहळा झाला. जान्हवीला राष्ट्रस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी जानव्हीचेवडील भास्कर हातमोडे उपस्थित होते.**

# उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी केले; महायुती सरकारच्या निर्णयाचे स्वागत

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्राचा आधुनिक शेती व वाढत्या यांत्रिकीकारणाचा वेग लक्षात घेऊन महसूल विभागाने अतिशय क्रांतिकारी व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

बांधावरून जाणारे सध्याचे पारंपरिक अरुंद शेतरस्ते आधुनिक कृषी अवजारांची ये – जा सुलभ व्हावी, तसेच शेतीमाल योग्य वेळेत बाजारपेठेत पोहचावा यासाठी ३ ते ४ मीटर, म्हणजे जवळपास १२ फूटाचे रस्ते करण्यात येणार आहेत. पारंपरिक शेत रस्ता बांधणीच्या १९६६ च्या निर्णयानंतर प्रथमच म्हणजे, सुमारे ६० वर्षांनी महाराष्ट्राच्या आधुनिक शेतीसाठी हा निर्णय झाला आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महायुती सरकारचा हा ऐतिहासिक निर्णय असून यामुळे शेतकरी बांधवांच्या जीवनात आर्थिक उन्नती होणार असल्याचे मत उरण तालुक्यातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा महाराष्ट्र शासन आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त प्रकाश ठाकूर यांनी व्यक्त केले आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आपल्या शेतीतील मालवाहतूक करण्यासाठी रस्त्या अभावी अडचणी येत होत्या. ही अडचण महायुती सरकारने सोडवली असून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती करण्यासाठी अरुंद रस्ते मोठे करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. हा निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असून या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत असल्याचे प्रकाश ठाकूर यांनी सांगितले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनातून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्णयामुळे शेतकरी हिताची पायाभरणी होत असून, सर्वंकष सर्व बाबींचा विचार करून हा निर्णय अस्तित्वात आला आहे.

विशेष म्हणजे, शेतरस्त्यांच्या जागांमध्ये अतिक्रमणासह भविष्यातील खरेदी विक्रीच्यावेळी अन्य शेतीविषयक वाद उद्भवू नयेत म्हणून या शेतरस्त्यांची नोंद आता जमिनीच्या ७/१२ मध्ये होणार आहे. हे शेतरस्ते जलदगतीने पूर्ण करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्याबाबत शासन आदेश जारी करण्यात आला आहे.

यामुळे आता शेतकरी बांधवांना आधुनिक शेती व उत्पन्नवाढीसाठी या निर्णयाचा नक्की फायदा होईल अशी अपेक्षा उरण मधील प्रगतशील व आदर्श शेतकरी प्रकाश ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

# कोरोनाची लक्षणे दिसताच आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधा

## आरोग्य विभागाचे आवाहन

**उरण : बातमीदार**

भारतासह संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकवणाऱ्या कोरोना विषाणूचे सुमारे तीन वर्षानंतर पुन्हा आगमन झाले आहे. आशिया खंडातील सिंगापूर, थायलंड,चीन आणि हाँगकाँग या देशांमध्ये उपद्रव्य मूल्य दाखवण्यास सुरुवात केल्यानंतर कोरोनाने पाय भारतात पसरले आहेत.

केरळ मार्गे भारतात दाखल झालेल्या या विषाणुने आता राजधानी दिल्लीसह,महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक,उत्तर प्रदेश, आणि पश्चिम बंगाल मध्ये उपद्रव्य मूल्य दाखवण्यास सुरुवात केली आहे.

यामध्ये कोरोनाचे जेएन–१ हे नवे प्रतिरूप ही (व्हेरियंट) दाखल झाले आहेत तथापी देशातील जनतेने कोणत्याही प्रकारे घाबरून न जाता सतर्क राहण्याची गरज आहे असे आवाहन भारतीय विज्ञान संशोधन संस्था आयसीएमआर ने केली आहे कोरोनाच्या या प्रतिरूपाचा उपद्रव्य यापूर्वी भारतीयांनी अनुभवलेल्या ’ओमीक्रोन ’या प्रतिरूपापेक्षा वेगळा नाही त्याच्यावर नागरिकांनी घेतलेली कोरोनाची लस प्रतिकार करण्यास पुरेशी आहे, मात्र लक्षणे दिसताच आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधून त्यावर उपचार करून घेणे गरजेचे आहे, असे आवाहन उरण तालुका आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# विद्यार्थी-पालक धास्तावले

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारने जगभरातील अमेरिकी दूतावासांना विद्यार्थी व्हिसासाठी अपॉइंटमेंट देणे थांबवण्याचे आदेश मंगळवारी दिले. अमेरिकेत शिक्षणासाठी जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांमध्ये ट्रम्प सरकारच्या या घोषणेमुळे भविष्याबाबत प्रचंड चिंतेचे आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. तूर्तास यासंदर्भात ट्रम्प सरकारकडून पुढे काय पाऊल उचलले जाते त्याची वाट पाहण्याखेरीज काही पर्याय दिसत नाही.

**ट्रम्प सरकारने अमेरिकेत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांसमोरील अडचणीत मंगळवारी आणखी भर घातली. विद्यार्थी व्हिसासाठीच्या नव्या मुलाखतींसाठी वेळा देऊ नका असे आदेश अमेरिकेने जगभरातील त्यांच्या दूतावासांना दिले आहेत. विद्यार्थी व्हिसासाठी अर्ज करणाऱ्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटची सखोल तपासणी करण्यासाठी अमेरिका एक योजना तयार करत असल्याचेही सांगण्यात आले आहे. अमेरिकेत शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या एकूण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे. वर्ष २०२३-२४ मध्ये २.६८ लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकेत प्रवेश घेतला होता. या निर्णयामुळे भारत व अन्य देशांतून अमेरिकेत शिक्षणासाठी जाऊ इच्छिणारे विद्यार्थी धास्तावले आहेत. अमेरिकेत शिक्षण घेण्यास इच्छुक असणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांना त्यांच्या देशातील अमेरिकन दूतावासात मुलाखतीसाठी अपॉइंटमेंट घ्यावी लागते. यापुढे सोशल मीडियावर व्यक्त केलेल्या मतांवरून व्हिसा नाकारला जाण्याची शक्यता दिसत असल्याने विद्यार्थ्यांना काळजी घ्यावी लागणार आहे. अमेरिकेत शिक्षण घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी अमेरिकी दूतावासाच्या अधिकृत वेबसाइटकडे पुढील आदेशांसाठी लक्ष ठेवावे असे सांगितले जाते आहे. परदेशी विद्यार्थीच नव्हे तर अमेरिकी शिक्षण संस्थांसाठीही हा निर्णय चिंता वाढवणारा आहे. अमेरिकेचे या निर्णयातून अब्जावधी डॉलरचे नुकसान होऊ शकते. तेथील अनेक शिक्षण संस्था परदेशी विद्यार्थ्यांवर मोठे शैक्षणिक शुल्क आकारून आपल्या खर्चाचा ताळमेळ बसवतात. तेथील काही विद्यापीठांनी तर पैसे मिळतात म्हणून प्रचंड संख्येने परदेशी विद्यार्थी घेण्यास सुरूवात केली आहे. अर्थात, अमेरिकन विद्यापीठांतील पॅलेस्टाइन समर्थक विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या कारवाईची पार्श्वभूमीही या निर्णयाला आहे. ट्रम्प सरकारचा परदेशी विद्यार्थ्यांसंदर्भात हार्वर्ड विद्यापीठाशी वाद सुरू आहे. या विद्यापीठातील २७ टक्के विद्यार्थी परदेशी आहेत. यापैकी एक तृतियांश विद्यार्थी हे चीनमधील आहेत. हार्वर्डमधील भारतीय विद्यार्थ्यांची संख्या ७०० हून अधिक असल्याचे सांगितले जाते. हे विद्यापीठ डाव्या विचारसरणीचे असून काही कॉलेजांमध्ये ज्यूविरोधी भावनेला चिथावणी दिली जाते असे म्हटले जाते. अमेरिकेत येणाऱ्या लोकांच्या तपास प्रक्रियेबाबत ट्रम्प सरकार अतिशय गंभीर असल्याने यापुढे असेच धोरण सुरू राहील असेही दिसते. ट्रम्प सरकारने यावरून यापूर्वीच अनेक परदेशी विद्यार्थ्यांना मायदेशी परत पाठवले आहे. अनेकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. काही विद्यापीठांना देण्यात येणारा कोट्यवधी डॉलरचा सरकारी निधीही ट्रम्प यांनी रोखला आहे. यातील काही निर्णयांवर न्यायालयाने बंदी देखील आणली आहे. उत्तम शैक्षणिक कामगिरी असलेले विद्यार्थीच अमेरिकेत यावेत यादृष्टीनेही हा प्रयत्न असू शकतो असेही काही तज्ज्ञांना वाटते. यापूर्वी ब्रिटन आणि अन्य काही युरोपीय देशांनीही उत्तम शैक्षणिक कामगिरीच्या निकषांवर विद्यापीठांत प्रवेश देण्याचे धोरण स्वीकारले आहे. भारतीय विद्यार्थी ही अमेरिकेची मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे त्यांची संख्या कमी करण्याचा उद्देश यामागे नसावा असे जाणकारांना वाटते. तूर्तास पुढील आदेशाची वाट पाहण्याखेरीज मात्र काही पर्याय दिसत नाही.**

# पर्यटकांवर बंदी नको त्यांना सुविधा द्या





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

पावसाळा सुरू झाल्यामुळे मोठ्याप्रमाणावर पर्यटक पावसाळी पर्यटनाला निघतील. रायगड जिल्ह्यातदेखील पावसाळी पर्यठटासाठी पर्यटक येताता. काही अतिउत्साही पर्यटकांमुळे अपघात होतात. अपघातनंरत त्या पर्यटन स्थळांवर जाण्यात पर्यटकांना बंदी घातली जाते. त्यातुळे पर्यटाक नाराज होतात. त्याचबरोबर त्या गावतील लोकांना मिळणारा रोजगार देखील बंद होतो हे टाळण्यासाठी या ठिकाणी सुरक्षीततेच्या काही उपाययोजना करायला हव्यात. बंद घालण्या पेक्षा पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी सुविधा उपलबध्द करून द्यायला हव्यात.

रायगड जिल्हा समुद्रकिनारे, नारळी फोळीच्या बागा आसा निसर्गसौदर्याने नटलेला आहे. ऐतिहासिक स्थळे, धार्मिक स्थळे, गड, किल्ले या जिल्ह्यात आहेत. त्याचबरोबर पावसाळी पर्यटनासाठी देखील या जिल्ह्यात भरपूर स्थळ आहेत. त्याची महिती नसल्यामुळे पर्यटक तिकडे वळत नाहित. काही धबधबे पर्यटकांना आर्षित करतात. तेथे पासाळ्यात दरवर्षी हजारो पर्यटक जातात, परंतु या ठिकाणी सहज पोहचता येत नाही. त्यामुळे अनेक लोक तेथे जात नाहीत. या जिल्ह्यात पासाळी पर्यटनाला चालना द्यायला हवी. या जिल्ह्यात काही धबधबे असे आहेत जेथे पर्यटक मोठ्याप्रमाणावर जातात. या धबधब्यांच्या ठिकाणी चांगल्या सुविधा दिल्या पाहिजेत. यातून स्थानिकांना रोजगार उपलबध्द होऊ शकतो.

रायबड जिल्ह्यात मांडावा, किहीम, वरसोली, अलिबाग, आक्षी, नागाव, रेवदंडा, काशीद, मुरुड, दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर हे समुद्रकिनारे, आहेत. रायगड, कुलाबा, जंजिरा, कोर्लई, ताळा, सुधागड असे किल्ले आहेत, गांधारपाले, कुडा आदी लेण्या आहेत. पाली व महाड हे अष्टविनायकातील गणपती आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात पर्यटकांची गर्दी असते.

वर्षा सहलीसाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्याप्रमाणवार पर्यटक येतात. रायगड जिल्ह्यातील ताम्हणी घाट हे वर्षा सहलीसाठी पर्यटकांचे आवडीते ठिकाण. ताम्हणी घाटात छोटेमोठे अनेक धबधबे आहेत. या धबधब्यांवर जाण्यासाठी फार कष्ट घ्यावे लागत नाहीत. त्यामुळे वर्षा सहलीसाठी ताम्हाणी घाट पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. श्रावण महिन्यात पर्यटक या धबधब्यांवर मोठ्याप्रमाणावर येतात. सुट्टीच्या दिवशी ताम्हाणी घाट पर्यटकांनी गजबजलेला असतो.

महाड तालुक्यातील मांडला, केंबुर्ली, शिवथरघळ, पोलादपूर तालुकयातील मोरझोत, रोहातलुक्यातील सुकेळी खिंड, कर्जत तलुक्यातील आशाणी-कोशेणी, खांडस, झेनीथ, अलिबाग तालुक्यातील सिध्देश्वर, मागणगाव तालुक्यातील देवकुंड, मुरूड तालुक्यातील सवतकडा पनवेल तालुक्यातील पांडवकडा हे धबधबे आहेत. मुरूड तालुक्यतील गारंबी, आंबोली, फणसाड, आलिबाग तलुक्यातील तीनवीरा ही तलाव आहेत. जिल्ह्याती इतरही तालव आहेत जेथे पर्यटक पावसाळी पर्यटनासाठी जातात. परंतु काही अतिउत्साही पर्यटकांमुळे धबधब व तालावांच्या ठिकाणी आपघात घडतात. असे अपघात झाले की प्रशासन यठिकाणी जाण्यास पर्यटकांना बंदी घालते. असे अपघात टळण्यासाठी उपयायोजना केल्या पाहिजेत. बंदी घालून तेथील लोकांचा व्यावसाय बोडतो. तसेच ज्या खर्योअर्थान वर्षासहलीचा आनंद लुटायचा असतो त्यांच्या आनंदावर विर्जन पडते. हे टाळण्यासाठी अतिउत्साही पर्यटकांना आवरले पाहिजे. ही जबबादारी प्रशासनावर नढकलाता पर्यटकांनी आपणच स्वतःला अवरले पाहिजे.

मांडला, मोरझोत, आशाणी, काशेणी, सवतकडा हे चांगले धबधबे आहेत. हे धबधबे पर्यटकांना आकर्षीत करतात. या धबधब्यांवर पर्यटक मोठ्याप्रमाणावर येत असताता, परंतु या ठिकाणी पर्यटकांना सहज पोहचता येत नाही. पर्यटकांना पोहचण्यासाठी रस्ते नाहीत. तसेच तेथे सुरक्षीतेसाठी उपयायोजना नाहीत. मोरझोत धबधब्यापर्यत मोठी गाडी जाऊशकते. परंतु तेथे पर्यटक प्रवाहपर्यत जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आपघात होण्याची शक्यता असते. याठिकाणी पायवाट तयार करून तेथे सेल्फीपॉईट तयार केल्यास अपघात टाळता येतील. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली धबधब्यात पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. संरक्षण कडे बांधण्यात आले आहेत. तशाच प्रकारचे संरक्षणकडे रायगड जिल्ह्यातील कही धबधब्यांजवळ बांधल्या अपघात टळू शकतात. रायगड जिल्ह्यातील काही प्रमुख धबधब्यांच्या ठिकाणी जर चांगल्या सुविधा उपबध्द करू दिल्या तर पावसाळी पर्यटनास चालना मिळू शकते. आलेला पर्यटक थांबला पहिजे. तरच पर्यटन व्यवसाय खऱ्या अर्थाने वाढेल. जर निवास व भोजनाची चांगली सुविधाच नसेल तर पर्यटक थंबणार नाही. त्यामुळे स्थानिक पर्यटन व्यावसायिंकांना प्रोत्साहन द्यालया हवे. त्यांना काही सवलती दिल्या पाहिजे. पर्यटन व्यावसाया वाढला पाहिजे म्हणायच आणि हा व्यावसाय करणार्यांवर कारवाई करायची हे योग्य नाही. उलट पर्यटन व्यावसाय करणार्यांना काही सवलती द्यायला हव्यात. जे लोक पर्यटन व्यवसाय करतात त्यांना काही सवलती मिळाल्या पाहिजे. पर्यटन व्यावसाय करणार्यांना देखील प्रत्साहन द्यायला हवे.

## बदलते तंत्रज्ञान

# बीएसएनएलची वेगाने वाटचाल

सरकारी टेलिकॉम कंपनी बीएसएनएल गेल्या काही महिन्यांपासून आपल्या नेटवर्कमध्ये सातत्याने सुधारणा करत आहे. कंपनीने आपली कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी १ लाख नवीन ४जी मोबाईल टॉवर्स बसवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यापैकी ९३,४५० टॉवर्सची उभारणी झाली असून ते सुरू करण्यात आले आहेत. केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी ही माहिती दिली इंडिया मोबाईल काँग्रेसच्या थीम लॉन्चप्रसंगी त्यांनी ही माहिती दिली. विशेष म्हणजे, कंपनी पुढील महिन्यापासून ५जी सेवेची चाचणीदेखील सुरू करू शकते.





नेटवर्क कनेक्टिव्हिटी सुधारण्याचे उद्दिष्ट

खाजगी टेलिकॉम कंपन्यांनी आपल्या रिचार्जच्या किमती वाढवल्यामुळे लाखो युजर्स इङ्छङ नेटवर्कवर आले होते, पण खराब कनेक्टिव्हिटीमुळे कंपनीच्या युजर्समध्ये सतत घट होत आहे. आता यासाठी कंपनीने आपल्या वेगाने आपल्या टॉवर्सची संख्या वाढवणे सुरू केले आहे. नवी दिल्ली येथे आयोजित आयएमसी २०२५मध्ये केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया म्हणाले, 'आपण आपले ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत. आम्ही ९३,४५० टॉवर्स बसवण्याचे काम पूर्ण केले आहे, परंतु आम्हाला अजून बराच पल्ला गाठायचा आहे.'

यावर्षी इंडिया मोबाईल कॉंग्रेस ८ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. दरम्यान, सरकारी टेलिकॉम कंपनी स्वावलंबी भारत योजनेअंतर्गत स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून हे नवीन मोबाइल टॉवर बसवत आहे. केंद्रीय एजन्सी सी-डॉट, तेजस नेटवर्क, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिस (टीसीएस) आणि केंद्र सरकारने यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. गेल्या २२ महिन्यांपासून हे चारही भागधारक बीएसएनएलची कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी एकत्र काम करत असल्याची माहितीही सिंधिया यांनी दिली.

एकूणच जी बीएसएनएल कंपनी मागे गेली होती त्या कंपनीने आता कात टाकली असून आता तिची पुन्हा एकदा जोमाने वाटचाल सुरू आहे. अशीच प्रगती झाल्यास पुन्हा कंपनी वरच्या स्थानी येईल.

# चित्रकार सावळाराम हळदणकर



**निमित्त**

महाराष्ट्रातील प्रख्यात चित्रकार सावळाराम लक्ष्मण हळदणकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया या लेखातून त्यांच्याविषयी... सावळाराम लक्ष्मण हळदणकर यांचा जन्म २५ नोव्हेंबर १८८२ रोजी सावंतवाडी येथे झाला. सावंतवाडी येथील विद्यार्थिदशेतच त्यांनी चित्रकलेतील ग्रेड (श्रेणी) परीक्षेतही विशेष नैपुण्य संपादन केले. चित्रकलेच्या पुढील शिक्षणासाठी १९०३ मध्ये ते मुंबईला गेले आणि त्यांनी तेथील सर जे. जे. स्कूल ऑफआर्टमध्ये कलाशिक्षणासाठी रीतसर प्रवेश घेतला. तेथे त्यांना अनेक मातब्बर ज्येष्ठ कला-शिक्षकांचे व चित्रकारांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

विद्यार्थी-दशेपासूनच त्यांना चित्रकलेचीअनेक पारितोषिके मिळत गेलीआणि १९०७पासून चित्रकार म्हणून त्यांचा नावलौकिक झाला. मुंबई, मद्रास (चेन्नई), कलकत्ता (कोलकाता), सिमला, अमृतसर, म्हैसूर येथील प्रदर्शने, तसेच दिल्ली येथील ऑल इंडिया फाइन आर्ट्सअँड क्राफ्ट सोसायटीची प्रदर्शने अशा सर्व ठिकाणी त्यांची चित्रे झळकू लागली व अनेक चित्रांना मानाची पारितोषिकेही मिळाली. त्यांनी १९०६पासून १९५८पर्यंत मुंबईतील बॉम्बे आर्ट सोसायटी व आर्ट सोसायटीऑफ इंडिया यांच्या प्रदर्शनांत सातत्याने चित्रे पाठवली. त्यांनी नवोदित चित्रकारांना प्रशिक्षण देण्यासाठी १९०८मध्ये दादर येथे चित्रकला वर्ग सुरू केला. पुढे त्याचाच विस्तार होऊन १९४०मध्ये गिरगाव येथे 'हळदणकर फाइन आर्ट इन्स्टिट्यूट' ही संस्था स्थापन झाली. नव्या पिढीतील चित्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच प्रदर्शनादी विविध उपक्रम राब-विण्यासाठी त्यांनी काही स्नेह्यांच्या सहकार्याने 'आर्ट सोसायटी ऑफइंडिया' ही संस्था १९१८मध्ये स्थापन केली. आजही ही संस्था उत्तमकार्य करीत आहे. १९२५मध्ये त्यांना त्यांच्या मॉहमेडन पिलग्रिम या कॅन्व्हासवरील तैलरंगातील फकिराच्या चित्राला बॉम्बे आर्ट सोसायटीचे सुवर्णपदक मिळाले. त्यांच्या निर्मितीत प्रामुख्याने व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे व पौराणिक विषयांवरील प्रसंगचित्रे यांचा समावेश होतो. जलरंग व तैलरंगया दोन्ही माध्यमांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांतील तंत्रविशिष्ट बारकावेत्यांनी विलक्षण कौशल्याने आपल्या चित्रांतून दर्शविले पण त्यांनी शुद्ध पारदर्शक जलरंगांत रंगविलेली चित्रे त्यांतील अप्रतिम तंत्रकौशल्यासाठी देश-विदेशात वाखाणली गेली. चित्रांत साधलेले छायाप्रकाशाचे परिणाम, चित्रणासाठी वापरलेल्या कमी-अधिक जाडीच्या रंगछटा व रंगलेपनाचे कौशल्य ही त्यांची शैलीवैशिष्ट्ये जलरंग व तैलरंग या दोन्ही माध्यमांत जाणवतात. त्यांच्या अ पायस लाइफ (१९३५), ग्लो ऑफ होप (जलरंग, १९३६), पोर्ट्रेट ऑफ मिसेस डेव्हिस (जलरंग, १९३९ पहा : मराठी विश्वकोश, खंड ६, चित्रपत्र ४४), फकिरीतील अमिरी (१९४०), डिव्हाइन फ्लेम (जलरंग, १९४५), निरांजनी (कागदावर जलरंग, १९५२), स्वातमानंद स्वामी (१९५३-५४) इ. चित्रांपैकी ग्लो ऑफ होप हे चित्र सर्वाधिक गाजले. त्यांनी रंगवलेल्या पं. मदनमोहन मालवीय यांच्या व्यक्तिचित्राचा राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडून खास गौरव करण्यात आला (१९६४). दिल्ली येथील ललित कला अकादमीतर्फे १९६२मध्ये त्यांना अधिछात्रवृत्ती देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट कलाशिक्षक व शास्त्रीय संगीताचे दर्दी जाणकार म्हणूनही त्यांचे ख्याती होती. मुंबई येथे त्यांचे ३० मे १९६८ रोजी निधन झाले. **-श्री.दे. इनामदार**

## बातमीतील बात





## आरोग्य प्रहर

# हर्ब बाथ करून बघा; मिळतील अनेक फायदे...

घरातील कामं, बाहेरची कामं, लेकरांचा सांभाळ, वेगवेगळ्या गोष्टींच्या ईएमआय, वेगवेगळ्या जबाबदाऱ्या यामुळे भरपूर लोक सतत चिंतेत असतात. त्यामुळे त्यांना नेहमीच मानसिक थकव्यासोबतच शारीरिक थकवाही जाणवतो. यातच अंगदुखी, थकवा, मूड नसणे, निराशा अशाही समस्या होतात. आता हा थकवा घालवण्यासाठी किंवा अंगदुखी दूर करण्यासाठी अनेक उपाय आहेत. यातील एक नॅचरल उपाय आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. हा उपाय सोपा आणि खूप फायदेशीर ठरतो.



आंघोळ तुम्ही रोज करता तशी न करता वेगळ्या पद्धतीनं जर केली तर अंगदुखी, कणकण, आणि थकवा दूर करू शकता. यासाठी तुम्हाला फक्त आंघोळीच्या पाण्यात काही हर्बल टाकावे लागतील. हर्ब बाथ करण्यासाठी तुम्ही कोणतेही हर्बल निवडू शकता. जसे की, लॅवेंडर, पेपरमिंट, रोजमेरी आणि ओवा. जर तुमच्याकडे या गोष्टी लिक्विड स्वरूपात असतील तर २५ ते ३० मिली लीटर घ्या. पण जर हे हर्ब तुमच्याकडे ड्राय स्वरूपात असतील तर तुम्ही बकेटीत तीन ते चार चमचे टाकू शकता.

जर तुमच्याकडे ड्राय हर्ब असतील तर तुम्ही एक लीटर पाण्यात ते टाका. हे पाणी उलटू द्या आणि नंतर २० मिनिटे तसंच राहू द्या. आता हे पाणी गाळून आंघोळीच्या पाण्यात मिश्रित करा. हे लक्षात ठेवा की, जेव्हाही तुम्ही थकलेले असाल तेव्हा पाणी फार जास्त गरम घेऊ नका. आंघोळीचं पाणी कोमटच असावं. कारण याने शरीरात ब्लड सर्कुलेशन वाढवण्यास आणि नर्व्हसना रिलॅक्स करण्याचं काम करतं.

एक लिटर पाणी घ्या आणि त्याला उकडी येऊ द्या. या पाण्यात लॅवेंडर किंवा लेमन एसेंशिअल ऑइल मिश्रित करा. सोबतच ५ चमचे गुलाबजल मिश्रित करा. आता हे पाणी आंघोळीच्या पाण्यात मिश्रित करा. याने आंघोळ केल्यावर तुमचे मसल्स रिलॅक्स होतील आणि अंगदुखीही दूर होईल. हे उपाय तुम्ही आठवड्यातून दोनदा करू शकता.

आंघोळीच्या पाण्यात थोडं सैंधव मीठ घातल्यास याने त्वचेचं ब्लड सर्कुलेशन सुधारतं आणि त्वचा आतून ग्लो व्हायला लागते. यात आढळणाऱ्या मॅग्नेशिअम, सोडियम आणि कॅल्शिअमसारख्या मिनरल्सने शरीराला होणाऱ्या इन्फेक्शनपासून बचाव केला जाऊ शकतो. मिठाच्या पाण्यात असलेल्या तत्वांमुळे फंगल इन्फेक्शन वाढणं बंद होतं तसेच रोज या आंघोळीच्या पाण्यात मीठ टाकल्यास याने केसांमध्ये डॅंड्रफही होणार नाही.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ११, अंक ७३ | गुरुवार, मे २२, २०२५/ज्येष्ठ १, शके १९४७ | पृष्ठे ११, किंमत: रुपये ९.००

असाधारण क्रमांक १८२

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक–अ आणि एक–ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ मे २०२५.

### सूचना

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१,**

क्रमांक आयडीसी–२०१९/प्र.क्र. ४५५/उद्योग–१४. ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र तीन) यांच्या कलम १, पोट–कलम (३) अन्यये करण्यात आलेली व महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र, भाग चार–ब, दिनांक १३ एप्रिल २०२३, पृष्ठ क्रमांक १ ते ३ वर प्रसिद्ध करण्यात आलेली महाराष्ट्र शासनाचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्रमांक आयडीसी–२०१९/प्र.क्र. ४५५/ उद्योग–१४, दिनांक १३ एप्रिल २०२३ अन्वये उपरोक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेत नमूद केलेले मौजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील क्षेत्रास दिनांक १३ एप्रिल २०२३ या तारखेपासून लागू करणेत आलेल्या आहेत व उक्त क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या कलम २, खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अनुसूचीमध्ये जाहीर केलेल्या जमिनी त्या भागात समाविष्ट आहे. (यापुढे याचा उल्लेख उक्त जमीन असा करण्यात येईल);

आणि, ज्याअर्थी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरिता उक्त जमिनी औद्योगिक क्षेत्र माणून विकासासाठी या जागेची आवश्यकता असल्याचे राज्य शासनाचे मत आहे;

आणि, ज्याअर्थी उक्त जमिनीच्या जमीनमालकांचे व त्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे म्हणणे अधिनियमांच्या कलम ३२ चे पोट–कालम (२) प्रमाणे ऐकुन घेतलेले आहे व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने या कलमाच्या ३२ चे पोट–कलम (१) च्या अनुषंगाने उक्त जमीन संपादन करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) चा वापर करून सदर जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादीत केल्या असल्याबद्दलची ही नोटीस महाराष्ट्र शासन या कलमा अन्यये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रसिद्ध करीत आहे.

**अनुसूची**

मौजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.

| अनु. क्रमांक | सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | एकूण क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | ७० | पै | ०.०४२० |
| २ | ७१ | पै | ०.११८५ |
| ३ | ७२ | पै | ०.२०६५ |
| ४ | ७३ | पै | ०.६००० |
| ५ | ७४ | पै | ०.२१६५ |
| ६ | ७५ | पै | ०.६१८५ |
| ७ | ७६ | पै | ०.१०४० |
| ८ | ८७ | पै | ०.०२७० |
| ९ | ९४ | पै | ०.०३१५ |
| १० | ९५ | पै | ०.३७२५ |
| ११ | ९६ | पै | ०.०७३० |
| १२ | ९९ | पै | ०.०५८५ |
| १३ | १०० | पै | ०.५४५५ |
| १४ | १०१ | पै | ०.२७५५ |
| १५ | ५७६ | पै | ०.०४०० |
| १६ | ५८५ | पै | ०.२४२० |
| १७ | ५८६ | पै | ०.३७८० |
| १८ | ५८७ | पै | ०.३५२५ |
| १९ | ५८८ | पै | ०.३३७५ |
| २० | ५८९ | पै | ०.४०२० |
| २१ | ५९१ | पै | ०.०३०० |
| २२ | ६०४ | पै | ०.१२५० |
| २३ | ६०७ | पै | ०.२६४० |
| २४ | ६०८ | पै | ०.२३०० |
| २५ | ६०९ | पै | ०.२७४५ |
| २६ | ६१० | पै | ०.१८५५ |
| २७ | ६१७ | पै | ०.००३० |
| २८ | ६१८ | पै | ०.३६८० |
| २९ | ६१९ | पै | ०.४१७० |
| ३० | ६२० | पै | ०.३२१० |
| ३१ | ६२२ | पै | ०.०३२० |
| ३२ | ६२३ | पै | ०.२९९० |
| ३३ | ६२४ | पै | ०.०११५ |
| ३४ | ६२६ | पै | ०.१८०० |
| ३५ | ६२७ | पै | ०.१६२५ |
| ३६ | ६२८ | पै | ०.४२८० |
| ३७ | ६२९ | पै | ०.१६५० |
| ३८ | ९८७ | पै | ०.०२०५ |
| | | **एकूण** | **८.५५८०** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. श्रीकांत पुलकुंडवार,**
**शासनाचे सहसचिव.**

### INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd May 2025.

**Notice**

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.**

Na. IDC, 2019/ (C.R.455) /IND-14.- Whereas by Government of Maharashtra has by tho Government Notification, Industries, Energy and Labour Department, No.IDC. 2019/ (C.R.455)/IND-14, dated the 13th April 2023, issued under sub-section (3) of section 1 of the Maharashtra Industrial Development Act, 1961 (Mah. III of 1962) (hereinafter referred to as "the said Act"), and published in the Maharashtra Government Gazette, Extra Ordinary, Part IV/ B, dated 13th April 2023, an pages 4 to 5 notified the 13th April 2023, to be the date from which the provisions of Chapten VI of the snid Act, shall take effect in certain areas of village 'Shahbaz' in Taluka 'Alibaug', District "Raigad, mentioned in the Schedule appended to the said notification (hereinafter referred to as "the said area") and declared the said aren as an industrial area under clause (g) of section 2 of the anid Act for the purposes of the said Act;

And whereas, the lands mentioned in the Schedule appended hereto (hereinafter referred to as "the said lands") are situated in the said areas;

And whereas, the State Government is of the opinion that the said lands are required by the Maharashtra Industrial Development Corporation for development as an Industrial Area:

And whereas, after considering the cause shown by the owners in the said lands and by other persons interested therein and after giving such owners and person an opportunity of being heard in pursuance of notice issued under sub-section (2) of section 32 of the said Act, the Government of Maharashtra has decided to acquire the said lands in pursuance of the said sub-section (1) of section 32.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 32 of the said Act, the Government of Maharashtra hereby publishes this notice for acquiring the said lands for the purpose aforesaid.

*Schedule*

Village Shahbaz, Taluka Alibaug, District Raigad

| Sr. No. | Survey No. / Gat No. | Hissa No. | Total Area (H.R.) |
|---|---|---|---|
| 1 | 70 | Pt | 0.0420 |
| 2 | 71 | Pt | 0.1185 |
| 3 | 72 | Pt | 0.2065 |
| 4 | 73 | Pt | 0.6000 |
| 5 | 74 | Pt | 0.2165 |
| 6 | 75 | Pt | 0.6185 |
| 7 | 76 | Pt | 0.1040 |
| 8 | 87 | Pt | 0.0270 |
| 9 | 94 | Pt | 0.0315 |
| 10 | 95 | Pt | 0.3725 |
| 11 | 96 | Pt | 0.0730 |
| 12 | 99 | Pt | 0.0585 |
| 13 | 100 | Pt | 0.5455 |
| 14 | 101 | Pt | 0.2755 |
| 15 | 576 | Pt | 0.0400 |
| 16 | 585 | Pt | 0.2420 |
| 17 | 586 | Pt | 0.3780 |
| 18 | 587 | Pt | 0.3525 |
| 19 | 588 | Pt | 0.3375 |
| 20 | 589 | Pt | 0.4020 |
| 21 | 591 | Pt | 0.0300 |
| 22 | 604 | Pt | 0.1250 |
| 23 | 607 | Pt | 0.2640 |
| 24 | 608 | Pt | 0.2300 |
| 25 | 609 | Pt | 0.2745 |
| 26 | 610 | Pt | 0.1855 |
| 27 | 617 | Pt | 0.0030 |
| 28 | 618 | Pt | 0.3680 |
| 29 | 619 | Pt | 0.4170 |
| 30 | 620 | Pt | 0.3210 |
| 31 | 622 | Pt | 0.0320 |
| 32 | 623 | Pt | 0.2990 |
| 33 | 624 | Pt | 0.0115 |
| 34 | 626 | Pt | 0.1800 |
| 35 | 627 | Pt | 0.1625 |
| 36 | 628 | Pt | 0.4280 |
| 37 | 629 | Pt | 0.1650 |
| 38 | 987 | Pt | 0.0205 |
| | | **Total** | **8.5580** |

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**DR. SHRIKANT PULKUNDWAR,**
**Joint Secretary to Government.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ मे २०२५.

**शुद्धिपत्रक**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.**

क्रमांक आयडीसी. २०१९/(प्र.क्र.४५५)/ उद्योग–१४. ज्याअर्थी, अनुसूचित उल्लेखिलेल्या क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण सहाची अधिसूचना क्रमांक आयडीसी. २०१९/(प्र.क्र. ४५५)/ उद्योग–१४, दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार–व, पृष्ठ क्र. १ ते ३ वर दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने सदर अधिसूचनेच्या अनुसूचित उल्लेखिलेल्या क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात येईल) चे कलम सहा, दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी अंमलात आणले होते व आयडीसी. २०१९/(प्र.क्र.४५५)/ उद्योग–१४, दिनांक ७ जून २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील भाग चार–च, पृष्ठ क्र. १ ते २ वर दिनांक १० जून २०२४ रोजी शुद्धिपत्रक शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेले होते. उक्त अधिनियमाच्या आधारे मौजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील उक्त अनुसूचित नमूद केलेले क्षेत्र अधिनियमाच्या कलम २. खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केलेले आहे;

ज्याअर्थी, मौजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड या गावातील काही सर्व्हे नंबर मधील क्षेत्र संयुक्त मोजणीअंती कमी जास्त झाले असल्याचे संयुक्त मोजणी अहवालानुसार निदर्शनास आले असल्यामुळे सदरच्या सर्व्हे नंबरच्या क्षेत्रामध्ये बदल झाला असल्याने प्रकरण ६ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे;

तर, महाराष्ट्र सामान्य कलम कायदा, १९०४ च्या कलम २१ सोबत वाचण्यात येणाऱ्या उक्त अधिनियमाच्या कलम १, उप कलम ३ आणि कलम २ चे कलम (ग) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत महाराष्ट्र शासन असे जाहीर करते की, दिनांक २२ मे २०२५ पासून सदर अधिसूचनेत खालीलप्रमाणे बदल लागू झाले आहेत, असे मानण्यात येईल,

**परिशिष्ट**

**मौजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**

शुद्धिपत्रकावरील पृ. २ वरील नोंदीबाबत,

(अ) अनुक्रमांक ४ वरील नोंदी ऐवजी खालीलप्रमाणे :–

| अनुक्रमांक | ऐवजी | | अनुक्रमांक | वाचावे | |
|---|---|---|---|---|---|
| | सर्व्हे नंबर/गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | | सर्व्हे नंबर/गट नंबर | क्षेत्र (हे. आर) |
| ४ | ९५ पैकी | ०.१०४० | ४ | ९५ पैकी | ०.३७२५ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. श्रीकांत पुलकुंडवार,**
शासनाचे सहसचिव.

### INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd May 2025.

**CORRIGENDUM**

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.**

No. IDC. 2019/(C.R.455)/Ind14-Whereas, the Government of Maharashtra, by the Government Notification, issued by the Industry, Energy and Labour Department, No. IDC. 2019/(C.R.455)/Ind14, dated 13th April 2023 published in the Maharashtra Government Gazette, Part IV-B, dated the 13th April 2023 at pages 4 to 5 (hereinafter referred to as "the said Notification"), issued in exercise of the powers conferred by sub-section (3) of section 1 of the Maharashtra Industrial Development Act, 1961(Mah. III of 1962), appointed the 13th April 2023 to be the date from which the provisions of Chapter VI and Corrigendum issued by the Industry, Energy and Labour Department, No. IDC. 2019/ (C.R.455)/Ind14, dated 7th June 2024 published in the Maharashtra Government Gazette, Part IV-B, dated the 10th June 2024 at pages 3 to 4 of the said Act shall take effect in certain areas of village Shahbaz in Taluka Alibaug in District Raigad and declare to be an industrial area under clause (g) of section 2 of the said Act for the purposes of the said Act;

And Whereas, the in the joint measurement report of village Shahbaz in Taluka Alibaug in District Raigad, there are differences shown in some survey numbers areas which is less or more. It is necessary to amend the area of said notification.

Now, therefore, in exercise of the powers conferred by the sub-section (3) of section 1 and clause (g) of section 2 of the Maharashtra Industrial Development Act, 1961 read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904), and all of other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, with effect from the 22nd May 2025 amends the said notification, as under,-

Schedule

Village Shahbaz, Taluka Alibaug, District Raigad

On Corrigendum notification page No.4

(A) for entry 6 the following entry shall be substituted, namely :-

| Sr. No. | Instead of | | Sr. No. | Read as | |
|---|---|---|---|---|---|
| | Survey No./Gat No. | Area (H.R) | | Survey No./Gat No. | Area (H.R) |
| 6 | 95 Part | 0.1040 | 6 | 95 Part | 0.3725 |

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**DR. SHRIKANT PULKUNDWAR,**
**Joint Secretary to Government.**

क्र. जिमाका/राअ/जाहि/६९/८०३/ २०२५

# मुसळधार पावसानंतर स्वच्छतेवर भर

## नवी मुंबईत सर्वच ठिकाणी सफाई

**नवी मुंबई : बातमीदार**

आठवड्याच्या सुरुवातीला म्हणजे २६ मे रोजी कोसळलेल्या धुवांधार पावसामध्ये प्रामुख्याने बेलापूर विभागात २५ ते २६ मे रोजी सकाळी ८.३० ते ८.३० या २४ तासात ७१.८० मि.मी. आणि २६ व २७ मे रोजी सकाळी ८.३० ते ८.३० या २४ तासात १४२.०२ मि.मी. इतक्या मोठ्या प्रमाणावरील पावसात ५.१७ मी. इतका मोठ्या प्रमाणावरील उधाण भरती कालावधीत अतिवृष्टीचा जोर असल्याने सेक्टर ४, ५, ६, ११ येथील सखल भागात बराच काळ पाणी साचून राहिले.

या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण रात्रभर सेक्टर १२ येथील पंपींग हाऊसच्या ठिकाणी अतिरिक्त पंप लावून पाणी उपसा करण्यात आला. पाण्याला खाडीच्या दिशेने मोकळी वाट करुन देण्यात आली. त्याचप्रमाणे सेक्टर भागात अग्निशमन विभागाकडील पाणी उपसापंप कार्यान्वित करुन साचलेले पाणी



उचलून पाईपव्दारे खाडीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आली.

रस्त्यावर साचलेले पाणी निचरा झाल्यानंतर रस्त्यावर साचलेला गाळ उचलून घेण्यासाठी अतिरिक्त वाहने लावण्यात आली व जेटींग मशीनव्दारे रस्ते धुवून घेण्यात आले. यासाठी मलप्रक्रिया केंद्रातील शुध्दीकरण करण्यात आलेल्या प्रक्रियाकृत पाण्याचा वापर करण्यात आला.

त्यासोबतच बेलापूरसह सर्वच विभागांमध्ये रस्त्यांवरुन वाहून जाणाऱ्या पाण्याला अडथळा होऊ नये या दृष्टीने वॉटरएन्ट्रींमध्ये येणारा अडथळा दूर करुन वॉटर एन्ट्री खुल्या करण्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे नाले व गटारे यांच्या प्रवाहावरील अडथळे दूर करण्याचे कामही जलदगतीने करण्यात येत आहे.

बेलापूर सेक्टर १२ येथील स्ट्रॉम वॉटर पंप हाऊस याठिकाणी पंपींग मशीनची संख्या व क्षमता वाढविण्यात आलेली असून त्याठिकाणी एकूण १ हजार ०५० हॉर्स पॉवर इतक्या मोठया क्षमतेची अतिरिक्त पंपींग मशीन लावण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे पाईप आऊटलेट व्यवस्था व फ्लॅप गेट्स व्यवस्था यांचीही क्षमता वाढ करण्यात आलेली आहे. त्यासोबतच पॉवर बॅकअपसाठी त्याठिकाणी स्वतंत्र जनरेटरची व्यवस्था करण्यात आलेली आहे.


पावसाळा कालावधीच्या दृष्टीने नागरिकांना अडचण होउु नये यादृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक कार्यवाही तातडीने करुन घेण्यात येत असून नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी नवी मुंबई महानगरपालिका मध्यवर्ती आपत्ती नियंत्रण कक्ष येथे ०२२-२७५६७०६० / ०२२-२२७५६७०६१ या दूरध्वनी क्रमांकावर तसेच १८००२२२३०९ / १८००२२२३१० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# पनवेल पालिकेत समन्वय कक्ष स्थापन

## नागरी तक्रारींसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या शहर व औद्योगिक विकास प्राधिकरणाशी (सिडको) संबंधित विविध तक्रारींच्या निवारणासाठी प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. नागरिकांच्या तक्रारी वेळेत आणि प्रभावीपणे सोडवण्यासाठी 'समन्वय कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. यासंदर्भात महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी एक कार्यालयीन आदेश निर्गमित केले आहेत.



पनवेल शहरात अनेक नागरी समस्यांबरोबरच औद्योगिक विकास प्राधिकरणाशी (सिडको) संबंधित अडचणी, योजनांची अंमलबजावणी, पायाभूत सुविधा, परवानग्या आदी तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत असतात. या तक्रारींची योग्य ती दखल घेऊन तातडीने कार्यवाही व्हावी यासाठी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली समन्वय कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.

पनवेल महापालिकेचा हा उपक्रम नागरिकांच्या सोयीसाठी एक महत्त्वाचे निर्णय ठरणार असून, प्रशासन व जनतेमधील संवाद अधिक प्रभावी आणि पारदर्शक होईल, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला आहे.

### प्रशासनाचे निर्देश

सर्व कक्षाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी या समन्वय कक्षाच्या माध्यमातून मिळालेल्या तक्रारींबाबत माहिती घेऊन संबधित विभागाकडे पाठपुरावा करून सर्व तक्रारींची तातडीने दखल घेऊन निराकरण करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या कक्षासाठी सहा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये कक्ष प्रमुख उप परिवहन व्यवस्थापक अभिषेक पराडकर, सदस्य प्र. उप अभियंता विलास चव्हाण, सदस्य कनिष्ठ अभियंता, प्रितम पाटील, सदस्य कनिष्ठ अभियंता अनिल कोकरे, सदस्य कनिष्ठ अभियंता आशीष आरीकर, सदस्य लिपिक टंकलेखक अमर ज. पाटील असे अधिकारी आहेत.

## निवडक

### श्री महालक्ष्मी मातेचा वर्धापन दिन

**पनवेल :** श्री महालक्ष्मी मातेचा वर्धापन दिन सोहळा शनिवार ३१ मे रोजी दूंद्रेपाडा, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी होम हवन, कळसपूजन, महा अभिषेक, महाआरती, महाप्रसाद, भजन, हरिपाठ, जागर भजनाचे आयोजन सकाळी सात ते रात्री बारा वाजेपर्यंत करण्यात आले आहे. या वर्धापन दिन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

**पनवेल :** कुडाळदेशकर आद्य गौडब्राम्हण समाज मंडळ(पनवेल) तर्फे रक्तदान शिबीराचे आयोजन शनिवार दिनांक ७ जून २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजे पर्यंत पनवेल शहरातील ओरायन मॉल पनवेल येथे करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरासाठी एम जी एम कामोठे यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. तरी जास्तीत जास्त लोकांनी रक्तदान करावे यासाठी संपर्क श्याम वालावलकर(९९६७५८४३५१), हरेश परुळेकर(९८६९३७५२१५), अपूर्वा प्रभू (९८९२५२०७४५) व गंगाराम सामंत (९३२२६५६५७८) यांच्याशी संपर्क साधावा. शिबीर ओरायन मॉल यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आले आहे.

### नवी मुंबईत १९ कोरोनाबाधित

**नवी मुंबई :** शहरात बुधवारी चार जणांचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आला. बाधितांची एकूण संख्या १९ झाली आहे. नवी मुंबईच्या आठही विभागांत मिळून दोन रॅपिड अँटिजेन टेस्ट केल्या आहेत. एकूण रॅपिड अँटिजेन टेस्टची संख्या दोन आहे. बुधवारी आरटीपीसीआर चाचणी केलेल्या रुग्णांची संख्या २१ असून, एकूण आरटीपीसीआर टेस्ट केलेल्यांची संख्या ६० आहे. कोविड टेस्ट केलेल्यांची एकूण संख्या ६२ आहे.

# नवी मुंबईतील गल्ली-बोळात प्ले स्कूलचा सुळसुळाट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जून महिन्यात बच्चे कंपनीच्या प्ले स्कूलची सुरुवात होईल. प्ले स्कूल आणि पाळणाघर प्रवेशासाठी चालकांनी किती पैसे घ्यावेत यावर शासकीय काही बंधने नसल्याने अशाकडून मनमर्जी फी उकलण्यात येत असल्याचे निदर्शनास येते, अशा संस्था चालकांवर शासनाची बंधने असावीत, अशी मागणी होऊ लागली आहे.



नवी मुंबईतील गल्ली-बोळात प्ले स्कूलचा सुळसुळाट झाला आहे. मे-जून महिन्यात प्ले स्कूल जाहिरात ठिकठिकाणी झळकत असल्याचे दिसते. प्ले स्कूल सुरू करण्यासाठी शासनाचे कोणतेच धोरण नसल्याने त्याचा गैरफायदा घेऊन नवी मुंबईतील ठिकठिकाणी शेकडोंच्या संख्येत प्ले स्कूल थाटण्यात आली आहेत. विशेषतः फक्त दुकान परवान्यांच्या नावाखाली प्ले स्कूल उघडून हायफाय सुविधांच्या नावाखाली पालकांकडून लाखो रुपये लुटण्याचे काम संचालकाकडून केले जाते आहे.

नवी मुंबईत नोकरी करणाऱ्या दाम्पत्याची संख्या लक्षणीय आहे. त्यातच सद्या शहरात वाढत चाललेली विभक्त कुटुंब पद्धतीही तितकीच कारणीभूत आहे. लग्नानंतर एकत्र कुटुंबातून वेगळे निघालेल्या दाम्पत्याना मुलांना पाळणाघरात ठेवण्याशिवाय पर्यायच नाही. त्यामुळे नवी मुंबईत गेल्या काही वर्षांत शेकडोंच्या संख्येने प्ले स्कुल आणि पाळणाघर सुरू झालीत. नवी मुंबईतील नेरुळ,

### मनमर्जी फी वसुली

सानपाडा पाम बीच, ऐरोली, वाशी आदी ठिकाणी ब्रॅण्डेड प्ले स्कुलची संख्या सर्वाधिक आहे तर इतर शहरात पाळणाघरांची संख्या जास्त असल्याचे आढळून आले आहे.

आपल्या मुलांना शिक्षण व विविध खेळांसह अन्य सुविधा पुरण्याचे आमिष दाखवून प्ले स्कूल संचालक मनमर्जी फी उकळतात. त्यात मुलांच्या वयानुसार दर निश्चित होतात. घराघरामध्ये उघडल्या गेलेल्या पाळणाघरात किमान दर चार हजार पर महिना आहे तर साखळी सिस्टीममध्ये असलेल्या ब्रॅण्डेड प्ले स्कूलमध्ये वार्षिक एक ते दीड लाख रुपये पॅकेज आहे. ब्रॅण्डेड प्ले स्कुलमध्ये सीसी टीव्ही कॅमेरे बसवण्याचा आले असून त्याची एक लिंक थेट पालकांना स्मार्टफोन वर दिली जाते. त्या माध्यमातून आपल्या मुलावर पालकांना लक्ष ठेवणे सोयीस्कर होते. प्ले स्कूल चालविण्यासाठी शासनाकडे ठोस धोरण नसल्यामुळे प्ले स्कूलला कोणतेही नियम वा अटी नाहीत.

त्याचा फायदा घेऊन ठाणे कामगार आयुक्तालय येथून फक्त दुकान परवाना घेऊन प्ले स्कुल चालविले जातात. त्यामुळे नवी मुंबईतील किती पाळणाघरे वा प्ले स्कुल आहेत याची आकडेवारी नवी मुंबई महापालिका वा जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडे उपलब्ध नाही.

> **नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात सुरू असणाऱ्या प्ले स्कूल वा पाळणाघर याबाबत शासकीय कोणतीही नियमावली व नियम नाहीत, मात्र लहान मुलांवर प्ले ग्रुप वा पाळणाघर आदी ठिकाणी काही प्रसंग ओढवला तर संबंधित पालकांनी पोलीस ठाण्यात जाऊन गुन्हा दाखल करावा.**
> **-प्रा. अरुणा यादव, शिक्षण अधिकारी, नवी मुंबई मनपा**

# सावरकर जयंतीदिनानिमित्त अभिवादन

**नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीदिनाचे औचित्य साधून महापालिका मुख्यालयातील म्फिथिएटरमध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे व समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी सहा.आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूपा परळीकर, प्रशासकीय अधिकारी दत्तात्रय काळे व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# चिर्लेच्या उपसरपंचपदी श्रीकांत पाटील

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिर्ले ग्रामपंचायत मध्ये शेकापविरोधात काँग्रेस भाजप अशी आघाडी आहे. नुकताच झालेल्या उपसरपंच निवडीमध्ये काँग्रेस भाजप आघाडीचे उमेदवार काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्रीकांत पाटील (मते ७) यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी शेकाप उमेदवार रंजना तुळशीराम मढवी (मते ५) यांचा पराभव होऊन काँग्रेस भाजप युतीचे उमेदवार श्रीकांत पाटील हे उपसरपंचपदी निवडून आले.

या वेळी डॉ. मनिष पाटील, यसंतोष राम पाटील, भाजप नेते दिपक पाटोल, समिर मढवी, राजन घरत, गाव अध्यक्ष विलास मढवी, सदानंद मढवी, विनोद पाटील, रामनाथ मढवी आदींनी शुभेच्छा दिल्या.




**नवी मुंबई : महाराणा प्रतापसिंह जयंतीदिनानिमित्त महापालिका मुख्यालयात प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांच्या उपस्थितीत महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अधिकारी, कर्मचारी यांचेसमवेत अभिवादन करण्यात आले.**

# अभिनयासाठी ताल आणि लय महत्त्वाचे घटक -प्रा.डॉ.जयंत शेवतेकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिनयासाठी ताल आणि लय महत्वाचे घटक असतात. रंगमंचावरील प्रत्येक कृती अभिनयाशी संबंधित असते. भावभावनांचे महत्त्व अबाधित ठेवण्यासाठी नवरसांवर अभिनेत्याचे प्रभुत्व असणे गरजेचे असते. असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.डॉ.जयंत शेवतेकर यांनी पनवेल येथे केले.



पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर पनवेलमधील फडके नाट्यगृहात सुरू आहे. या शिबिरात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

अभिनय प्रशिक्षण शिबीरातील बालगोपालांना नृत्याचा आनंद देत अभिनयातील नवरसांचे दर्शन घडविले. तर वरिष्ठ गटात मार्गदर्शन करताना त्यांनी अभिनयाची ए.बी.सी.डी. समजून सांगितली. या एबीसीडी चा उपयोग अभिनय करताना प्रत्येकालाच होतो, असे सांगत त्यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला.

अभिनय करताना कलाकारांनी आपल्या भावभावनावर नियंत्रण ठेवावे. नाटकातील अभिनय आणि सिनेमा, मालिका अभिनय यात बराच फरक असतो. त्याचे भान कलावंतांनी ठेवावे. स्विच ऑन आणि स्विच ऑफ या महत्त्वाच्या बाबी कलावंतांनी अंगीकाराव्या, असे उदाहरणासह दिग्दर्शक अमोल भावे यांनी सांगितले.

पद्मश्री अशोक सराफ, शरद पोंक्षे यांच्यासोबत दिग्दर्शक म्हणून काम करताना आलेल्या अनुभव त्यांनी सांगितले. प्रश्न उत्तरातून त्यांनी प्रशिक्षणार्थींची संवाद साधून माहिती दिली.

या वेळी अ.भा. मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेलचे प्रमुख कार्यवाह शामनाथ पुंडे यांच्या हस्ते दोन्ही प्रशिक्षकांना शाल व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले. या वेळी मनपाचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, प्रशिक्षक प्रा. अशोक केंद्रे, प्रा.रवि धुतडमल, प्रा.मनोज चिताडे उपस्थित होते.

अभिनय शिबिराचा समारोप ३० मे रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. या वेळी सहभागी शिबीरार्थींचे सादरीकरण होणार असून सर्व शिबीरांर्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

# पोलिसांच्या तत्परतेने टँकरमध्ये विसरलेले महिलेचे दागिने सापडले

**रसायनी, मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीसाच्या तत्परतेने प्रवासात टँकरमध्ये विसरलेले एका गरीब महिलचे दागिने तिला परत मिळाले. या घटनेने रसायनी पोलीसाचे कौतुक केले जाते आहे

या बाबतीत हकीकत अशी आहे की, कोमल सयाजी बुधावणे (रा.मोहोपाडा) ह्या २७ मे रोजी त्यांचे कुटुंबीयांसह सातारा येथील आनेवाडी टोलनाका येथून एका अनोळखी गोकुळ दुधाचे टँकरमध्ये बसून पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवे रीस ब्रिजखाली रात्री ११ वाजण्याच्या सुमारास उतरल्या. तेथून त्या मोहोपाडा येथे घरी आल्यानंतर त्यांनी सोन्याचे दागिन्यांसह ठेवलेली पर्स पाहिली असता ती दिसून आली नाही. ती टँकर मध्ये विसरल्याचे लक्षात आले.

त्याबाबत कोमल बुधावणे ह्या त्यांचे पतीसह २८ मे रोजी पोलीस ठाण्यात येऊन घडलेल्या घटनेबाबत माहिती दिली. त्यावेळी त्यांनी त्यांच्या पर्समध्ये दीड तोळ्याची सोन्याची चैन, ५ ग्रॅम वजनाची नथ असल्याचे सांगितले. पोलिसांनी तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या आधारे गोकुळ दुधाचा टँकरचा नंबर प्राप्त करून त्यावरील चालक अशोक मंडले (रा.सातारा) याचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्याच्याशी फोनद्वारे संपर्क साधून तक्रारदार कोमल बुधावणे यांचे पर्सबाबत विचारपूस करता त्यांनी त्यांची पर्स सुरक्षित ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर तक्रारदार यांची पर्स टँकर चालक यांचेकडून ताब्यात घेऊन त्यामध्ये दीड तोळ्याची सोन्याची चैन, पाच ग्रॅम वजनाची नथ असे कोमल बुधावणे यांचे पती सयाजी बुधावणे यांचे ताब्यात देण्यात आले.



# पंतप्रधान कौशल्य विकास योजनेद्वारे मोफत प्रशिक्षण



**खारघर : रामप्रहर वृत्त**

विश्व पंचशील बौद्ध चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत पंचशील बुद्ध विहार खारघर यांच्या माध्यमातून पंतप्रधान कौशल्य विकास योजनेद्वारे शासनाचे मान्यथा प्राप्त असलेले तीन महिन्यांचे मोफत प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकाचे माजी पाणीपुरवठा सभापती निलेश बाविस्कर आणि ॲड. सुशील महाडिक उपस्थितीत होते.

कार्यक्रमाचे आयोजन विश्व पंचशिल बौद्ध चॅरिटेबल ट्रस्ट व पंचशिल बुद्ध विहाराचे अध्यक्ष संतोष मल्लेशी सोनकांबळे यांनी केले होते. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचे खूप चांगले प्रतिसाद मिळाले. एकूण २२ विद्यार्थी यांनी कार्यक्रमाचे लाभ घेतले.

तीन महिन्याच्या मोफत प्रशिक्षणासाठी डॉक्युमेंटेशन एक्झिक्युटिव्ह, कन्साइनमेंट बुकिंग क्लिअर, इन्व्हेंटरी क्लिअर, डेटा एन्ट्री ऑपरेटर हे कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले आहे.

प्रशिक्षणाच्या वैशिष्ट्यांमध्ये स्मार्ट क्लासरूम, अनुभवी प्रशिक्षक, सुसज्ज ट्रेनिंग लॅब, शासकीय प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात येतात.

# मुलांना प्रशिक्षण देऊ इच्छिणाऱ्या माजी सैनिकांनी नाव नोंदवावे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनामार्फत जिल्ह्यातील शाळांमध्ये प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी मुलांमध्ये देशप्रेम जागविणे, त्यांच्यामध्ये शिस्त निर्माण व्हावी तसेच त्यांना विविध शस्त्रांबाबत माहिती व त्यांना मूलभूत लष्करी प्रशिक्षण देण्यासाठी माजी सैनिकांमधून स्वयंसेवकांची नेमणूक करावयाची असून स्वेच्छेने काम करण्यास इच्छूक असणाऱ्या माजी सैनिकांनी आपली नावे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड यांच्याकडे त्वरीत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,रायगड ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे.

प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी माजी सैनिकांचे जवळील वा गावातील शाळांमध्ये मुलांना ०१ तास प्रशिक्षण द्यावयाचे प्रस्तावित आहे. माजी सैनिक स्वयंसेवक पदावर विना मानधन काम करण्यास इच्छूक असल्यास व असे माजी सैनिक सद्या शासकीय सेवेमध्ये काम करत असल्यास त्यांना प्रशिक्षणाचे दिवशी काम करण्याची मंजूरी त्यांच्या वरीष्ठ कार्यालयाकडून घेण्यात येईल. स्वयंसेवक पदावर काम करण्यास इच्छुक माजी सैनिकांची माहिती संकलित करण्याकरीता गूगल फॉर्म भरण्यासाठी माजी सैनिक ग्रूपवर पाठविण्यात आलेला आहे.

# अधिसूचना

उप विभागीय अधिकारी पनवेल, दिनांक २०/०५/२०२५

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा हक्क अधिनियम, २०१३.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसुल व वन विभाग क्र. संकीर्ण १२/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दिनांक २९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ड) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमिन असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वस न व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती कारणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे? नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी पनवेल, उपविभाग पनवेल, (जुना ठाणानाका) यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची – एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव– धरणाकॅम्प, तालुका– पनवेल, जिल्हा– रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./ हि. नं | संपादीत क्षेत्र ( चौ.मी. मध्ये) |
|---|---|---|
| १ | १ | १०२५९.२०१ |
| २ | २/क | ३६१४.१९० |
| ३ | २१ | २८५९.०२१ |
| ४ | १९/२६ | १४४०,०० |
| | **एकुण** | **१८१७२.४१२** |

**गाव– पिसार्वे, तालुका– पनवेल, जिल्हा– रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./ हि. नं | संपादीत क्षेत्र ( चौ.मी. मध्ये) |
|---|---|---|
| १ | २०/१२ | |
| २ | २०/१३ | |
| ३ | २०/२/१ | |
| ४ | २०/२/२ | |
| ५ | २०/३ | |
| ६ | २०/४ | |
| ७ | २०/५ | ५८१५.०० |
| ८ | २०/६ | |
| ९ | २०/७ | |
| १० | २०/८/अ | |
| ११ | २०/८/ब | |
| १२ | २०/९ | |
| १३ | २४ | ८९५.४१६ |
| १४ | २३ | २७१७.९७९ |
| १५ | २९ | ३१२.१०७ |
| १६ | ३१ | ५६६.५८३ |
| १७ | ३४/१/२/अ | २८१०.५८३ |
| १८ | ३४/१/२/ब | ९०९.२५४ |
| १९ | ३७/७ | |
| २० | ३७/८ | ५८००.०० |
| २१ | ३७/१० | |
| २२ | ३७/११ | |
| २३ | ३८ पै. | २१७.७३ |
| | **एकुण** | **२००४४.६५२** |

**गाव– तुर्भे, तालुका– पनवेल, जिल्हा– रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./ हि. नं | संपादीत क्षेत्र ( चौ.मी. मध्ये) |
|---|---|---|
| १ | १७/१ | |
| २ | १७/२/अ | |
| ३ | १७/२/ब | |
| ४ | १७/३/५/१ | २३५.०० |
| ५ | १७/३/५/२ | |
| ६ | १७/४ | |
| ७ | १७/६ | |
| ८ | ८१/५१ | |
| ९ | ८१/५० | ८०५.५५३ |
| १० | ८१/४५ | १७५०.२९९ |
| ११ | ८२/१ | |
| १२ | ८२/२ | ७२२.०९३ |
| १३ | ८२/३ | |
| १४ | ७४/३ | |
| १५ | ७४/४ | ३१६३.०० |
| १६ | ७४/२ | |
| | **एकुण** | ६६७५.९४५ |

**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**अधिसूचना :– प्रकल्पाचे नाव** :– पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे धरणाकॅम्प, पिसार्वे व तुर्भे, एकूण क्षेत्र ४४८९३.००९ चौ.मी. येथील मौजे धरणाकॅम्प, ता. पनवेल येथील स.नं.१ पासून ते मौजे तुर्भे, ता. पनवेल येथील स.नं.८३ पर्यंतचा अंबरनाथ–कुळगांव बदलापुर व परिसर अधिसूचित विकास योजनेत दर्शविलेल्या ३०.०० मी. रुंदीच्या आखणीमध्ये बदल करण्यात आलेल्या रस्त्याने बाधित भूखंडाचे भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**निर्गमित :– प्रकल्प कार्याचे वर्णन** :– पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे धरणाकॅम्प, पिसार्वे व तुर्भे, एकूण क्षेत्र ४४८९३.००९ चौ.मी. येथील मौजे धरणाकॅम्प, ता. पनवेल येथील स.नं.१ पासून ते मौजे तुर्भे, ता. पनवेल येथील स.नं.८३ पर्यंतचा अंबरनाथ–कुळगांव बदलापुर व परिसर अधिसूचित विकास योजनेत दर्शविलेल्या ३०.०० मी. रुंदीच्या आखणीमध्ये बदल करण्यात आलेल्या रस्त्याने बाधित भूखंडाचे भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**करण्यापूर्वी :– समाजाला मिळणारे लाभ:–** पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

**अनुसूची–तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :– निरंक**

**अनुसूची–चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश:** –पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे धरणाकॅम्प, पिसार्वे व तुर्भे, एकूण क्षेत्र ४४८९३.००९ चौ. मी. येथील मौजे धरणाकॅम्प, ता. पनवेल येथील स.नं.१ पासून ते मौजे तुर्भे, ता. पनवेल येथील स.नं.८३ पर्यंतचा अंबरनाथ–कुळगांव बदलापुर व परिसर अधिसूचित विकास योजनेत दर्शविलेल्या ३०.०० मी. रुंदीच्या आखणीमध्ये बदल करण्यात आलेल्या रस्त्याने बाधित भूखंडाचे भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे. या जमिनी संपादन करण्यामुळे केवळ ४३ खातेदार बाधीत होत आहेत व खातेदार विस्थापित होत नाही. पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदींनुसार सामाजिक परिणाम निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही.

सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :–निरंक**

**टिप :–** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल,

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– २०/०५/२०२५**

**सही/–**
**(पवन चांडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

# Notification

Sub Divisional Officer Panvel, Dt.20/05/2025

Right to Fair Compensation in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

In pursuance of the Government Notification issued by the Government of Maharashtra in exercise of the powers conferred by the proviso to Clause (e) of Section 3 of the Land Acquisition, Rehabilitation and Right to Fair Compensation and Transparency Act. 2013 (30 of 2013). Revenue and Forests Department C Narrow 12/2014/Q No. 77/A-2 dated 29th January, 2015 (hereinafter referred to as "the said notification") notified that, in relation to the acquisition of land for a public purpose made in clause (d) of section 3 of the said Act, for a jurisdiction of 500 hectares in a district, the Collector of such district shall be deemed to be the appropriate authority for the purpose of the said Act.

AND WHEREAS, the land described in more detail in Schedule One annexed hereto (hereinafter referred to as "the said land") for a public purpose (hereinafter referred to as "the said public purpose") to the Collector of Raigad District having the appropriate authority under the said notification is) required or is likely to be required, the nature of which is set out in Schedule Two attached hereto, and it is hereby notified by sub-section (1) of section 11 of the said Act that the said land is likely to be required for the said public purpose

AND WHEREAS, the reasons compelling the displacement of the affected person in pursuance of the proposed land acquisition are set out in Schedule III attached hereto. (In case of displacement, the reasons should be mentioned in this schedule.)

AND WHEREAS, the social impact assessment summary is set out in Schedule IV attached here to.

And whereas, the details of the Administrator appointed for the purpose rehabilitation and resettlement under sub-section (1) of section 43 are set out in Schedule V attached hereto. (If appointment is required, details should be mentioned in this schedule.)

WHEREFORE, it is hereby declared that in accordance with sub-section 4 of section 19 of the said Act, no person shall, from the date of publication of this notification till the completion of the proceedings under Chapter IV of the said Act, make any transaction in the said land or any part thereof or in the said land Will not create any load.

Provided that, on application by the owner of the said land or part thereof, the District Collector may, by stating in writing the reasons for the special circumstances, exempt such owner from the operation of the aforesaid provision,

Provided further that if any person willfully contravenes this provision no compensation shall be made by the District Collector for any loss suffered by him.

Also, as per sub-section (5) of section 11 of the said Act, the Collector Right to Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014 (hereinafter referred to as "the said Rules")? It is also declared to undertake and complete the work of updating the land records as prescribed by sub-rule (3).

And WHEREAS, the District Collector under Clause (c) of Section 3 of the said Act is deputing the Sub-Divisional Officer Panvel, Sub-Division Panvel, (Old Thana Naka) to perform the functions of the Collector under the said Act.

**Schedule-I**

**Description of the Land**

**Village: Dharanacamp, Tal. Panvel, Dist.Raigad**

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.M |
|---|---|---|
| 1 | 1 | 10259.201 |
| 2 | 2/क | 3614.190 |
| 3 | 21 | 2859.021 |
| 4 | 19/26 | 1440.00 |
| | Total | 18172.412 |

**Village: Pisarve, Tal. Panvel, Dist.Raigad**

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.M |
|---|---|---|
| 1 | 20/12 | |
| 2 | 20/13 | |
| 3 | 20/2/1 | |
| 4 | 20/2/2 | |
| 5 | 20/3 | |
| 6 | 20/4 | 5815.00 |
| 7 | 20/5 | |
| 8 | 20/6 | |
| 9 | 20/7 | |
| 10 | 20/8/अ | |
| 11 | 20/8/ ब | |
| 12 | 20/9 | |
| 13 | 24 | 895.416 |
| 14 | 23 | 2717.979 |
| 15 | 29 | 312.107 |
| 16 | 31 | 566.583 |

पान ८ वर

# बीसीसीआयतर्फे ऑस्ट्रेलियाच्या भारत दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर

## सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये तीन संघात रंगणार १३ सामने

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलनंतर मेन्स टीम इंडिया शुबमन गिल याच्या नेतृत्वात इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. टीम इंडिया इंग्लंड विरुद्ध एकूण ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या दरम्यान बीसीसीआयने ऑस्ट्रेलियाच्या भारत दौऱ्याचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. भारत दौऱ्यावर ऑस्ट्रेलिया ए आणि ऑस्ट्रेलिया वूमन्स टीम येणार आहे. त्याव्यतिरिक्त दक्षिण आफ्रिकेची ए टीमही भारत दौरा करणार आहे. ऑस्ट्रेलियाचे दोन्ही संघ सप्टेंबर ते ऑक्टोबर दरम्यान भारत दौऱ्यावर असणार आहेत. तर साऊथ आफ्रिका ए टीम ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात भारतात सामने खेळणार आहे.



भारत दौऱ्यात एकूण ३ संघ इंडिया विरुद्ध १३ सामने खेळणार आहे. बीसीसीआयने सोशल मीडियावरुन याबाबतची माहिती दिली आहे. ऑस्ट्रेलिया वूमन्स टीम १४ ते २० सप्टेंबर दरम्यान टीम इंडिया विरुद्ध ३ सामन्यांची वनडे सीरिज खेळणार आहे. तर ऑस्ट्रेलिया ए टीम या दौऱ्यात २ मल्टी डे सामने आणि ३ वनडे मॅचेस खेळणार आहे. हे सामने १६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत.

ऑस्ट्रेलियाचे दोन्ही संघ भारत दौरा आटपून मायदेशी परततील. त्यानंतर दक्षिण आफ्रिका ए टीम भारत दौऱ्यावर येईल. साऊथ आफ्रिका ए टीम ३० ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर दरम्यान एकूण २० दिवस भारत दौऱ्यावर असणार आहे. टीम इंडिया विरुद्ध ऑस्ट्रेलिया वूमन्स यांच्यातील तिन्ही सामने चेन्नईत आयोजित करण्यात आले आहेत. उभयसंघातील सलामीचा सामना हा १४ सप्टेंबरला होणार आहे. दुसरा सामना १७ सप्टेंबरला खेळवण्यात येईल. तर तिसऱ्या आणि अंतिम सामन्याचा थरार २० सप्टेंबरला रंगेल.

ऑस्ट्रेलिया ए टीम भारत दौऱ्यात सर्व सामने हे लखनौ आणि कानपूरमध्ये खेळणार आहे. उभयसंघात आधी मल्टी डे सामने खेळवण्यात येतील. पहिला सामना हा १६ तर दुसरा सामना २३ सप्टेंबरला पार पडेल. दोन्ही सामने लखनौमध्ये होणार आहेत. तर कानपूरमध्ये ऑस्ट्रेलिया ए संघ ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. हे तिन्ही सामने अनुक्रमे ३० सप्टेंबर, ३ ऑक्टोबर आणि ५ ऑक्टोबरला खेळवण्यात येतील.

तसेच साऊथ आफ्रिका ए टीमचे भारत दौऱ्यातील मल्टी डे मॅचेस बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सीलेंस येथे खेळवण्यात येणार आहेत. तर एकदिवसीय सामन्यांचा थरार हा बंगळुरुतील एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये रंगणार आहे. मल्टी डे मॅचेस ३० ऑक्टोबर आणि ६ नोव्हेंबरला होणार आहेत. तर एकदिवसीय मालिकेतील ३ सामने अनुक्रमे १३, १६ आणि १९ नोव्हेंबर रोजी खेळवण्यात येतील.

# पालघरला होणार इक्विपड पॉवरलिफ्टिंग स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य सिनियर, सब ज्युनिअर, ज्युनिअर, मास्टर्स I, II, III, IV (Equipped) पुरुष व महिला पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद निवडचाचणी स्पर्धा पालघर येथे होणार आहे.

स्पर्धा रोटरी क्लब पालघर यांच्या आर्थिक सहकार्याने, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन व व पालघर जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशन यांच्या वतीने उपरोक्त स्पर्धा शनिवार व रविवार दिनांक ३१ मे ते ०१ जुन या कालावधीमध्ये लायन्स क्लब हॉल, रस्सम हॉटेल समोर, कचेरी रोड, पाच बत्तीजवळ, पालघर येथे आयोजित करण्यात आली आहे.

या राज्य स्पर्धेतून २२ ते ३० जुन या कालावधीत दावणगिरी-कनटक या ठिकाणी होणाऱ्या वरीष्ठ, सब ज्युनियर, ज्युनिअर राष्ट्रीय (पुरुष व महिला) पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठीचा महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यात येणार आहे.















पान ७ वरुन

**Village: Pisarve, Tal. Panvel, Dist.Raigad**

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.M |
|---|---|---|
| 17 | 34/1/2/अ | 2810.583 |
| 18 | 34/1/2/ब | 909.254 |
| 19 | 37/7 | 5800.00 |
| 20 | 37/8 | |
| 21 | 37/10 | |
| 22 | 37/11 | |
| 23 | 38 (P) | 217.73 |
| | Total | 20044.652 |

**Village: Turbhe, Tal.Panvel, Dist.Raigad**

| Sr.No. | Survey No. | Area in Sq.M |
|---|---|---|
| 1 | 17/1 | 235.00 |
| 2 | 17/2/अ | |
| 3 | 17/2/ब | |
| 4 | 17/3/5/1 | |
| 5 | 17/3/5/2 | |
| 6 | 17/4 | |
| 7 | 17/6 | |
| 8 | 81/51 | 805.553 |
| 9 | 81/50 | |
| 10 | 81/45 | 1750.299 |
| 11 | 82/1 | 722.093 |
| 12 | 82/2 | |
| 13 | 82/3 | |
| 14 | 74/3 | 3163.00 |
| 15 | 74/4 | |
| 16 | 74/2 | |
| | **Total** | **6675.945** |

**Schedule-II**

**Statement on the nature of public purpose**

Notification: Name of the project: Mouje-Dharna Camp, Pisarve and Turbhe within Panvel Municipal Corporation limits, total area 44893.009 sq.m. Mouje-Dharna Camp, from S.No.1 in Panvel Taluka to Mouje-Turbhe, Purpose of land acquisition of the plot affected by the road which has been changed in the design of 30.00 m width as shown in the notified development plan of Ambernath-Kulgaon Badlapur and vicinity up to S.No.83 in Panvel.

**Description of Exit Project : -** Mouje-Dharna Camp, Pisarve and Turbhe within Panvel Municipal Corporation limits, total area 44893.009 sq.m. Mouje-Dharna Camp, from S.No.1 in Tal. Panvel to Mouje-Turbhe, Tal.Panvel to S.No.83 in Tal.Ambernath-Kulgaon Purpose of land acquisition of the plot affected by the road which has been changed in the width design of 30.00 m as shown in the Badlapur and Surroundings Notified Development Plan.

**Before :- Benefits to society : -** Since the industrial importance and urbanization of Panvel city, as well as its rapid development and expansion, cannot be achieved without the acquisition of the proposed area. Therefore, it is necessary to widen the road for public purpose.

**Schedule-III**

**Compelling the displacement of the affected person :- Nil**

**Schedule-IV**

**Summary of Social Impact Assessment: -** Panvel Municipal Corporation limits, Mouje-Dharna Camp, Pisarve and Turbhe, total area 44893.009 sq.m. Mouje-Dharna Camp, from S.No.1 in Tal. Panvel to Mouje-Turbhe, S.No.83 in Tal. Panvel, Ambernath-Kulgaon Badlapur and the area is required to acquire land for the plot affected by the road which has been modified in the 30.00 m. width design as shown in the notified development plan. Only 43 account holders are being affected by the acquisition of these lands and the account holder is not displaced. Since the industrial importance and urbanization of Panvel city as well as its development and expansion are happening rapidly, the society will not be able to progress without acquiring the proposed area. Therefore, the public the road needs to be widened for traffic. Therefore, there is no need for a social impact assessment study as per the provisions of Sections 9 and 40 of the Land Acquisition Act 2013 in the public interest.

The said land acquisition process should be started at the earliest.

The amendment to chapter III under Close 10 A of the LAAR (Maharashtra & Annendment) Act 2018

**Place: Panvel**
**Date: 20/05/2025**

**sd/-**
**(Pavan Chandak)**
**Sub Divisional Officer**
**Panvel Sub Division Panvel**

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/७२/८१२/२०२५

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com